

# आमची आई, प्रमिला शामराव कुलकर्णी (मांडाखळीकर)

## ॥ जीवेत शरद: शतम ॥

लेखिका: सौ सुषमा कुलकर्णी बुद्रुककर

*ती. बाबा,*

*आदरणीय सतीश दादा,*

*आणि आमचा लाडका डॉ संजू....*

*हे पुस्तक लिहिताना तुमच्या स्मृती सतत पानोपानी मनाला स्पर्शून जात होत्या....*

*साश्रू नयनांनी .... माझे हे पहिले पुस्तक तुम्हाला समर्पित...*

*सौ.सुषमा कुलकर्णी बुद्रुककर*

## आई, तुझ्यासाठी काय लिहू...

तुला आरोग्यमय आयुष्यासाठी आमच्या सर्वांकडून शुभेच्छा..

आई साठी काय लिहू ? कसे लिहू? आई तुझ्या महतीसाठी  लागतील एवढे शब्द नाहीत माझे मोठे.. पण प्रयत्न करून पाहू...

आम्हा भावंडांच्या आधारवड अशी आमची आई. अत्यंत प्रेमळ या सगळ्यांवर प्रेमाचा वर्षाव करणारी. आमच्या बालपणीच्या आठवणी ऐकताना आम्हा भावंडांना  खूप आवडत असे. आई आणि बाबांनी आमच्यावर केलेले संस्कार, येणाऱ्या अडचणी त्यावर केलेली मात हे सगळं संग्रहित करावं असं नेहमी वाटायचं.

पण ही संधी चालून आली, ती लॉक डाऊन च्या काळात आम्ही कलकत्त्याला होतो सर्व व्यवहार ठप्प. याच वेळी दररोज एक प्रसंग लिहीत असे.  तसे आईला, संगिताला, धनुला वाचून दाखवत असे. संगीता रेकॉर्ड करायची. त्यांना आवडत गेलं. मला त्यातून प्रेरणा मिळाली. असे करता करता पंचवीस-सव्वीस प्रसंग झाले. अगदी सहज सोप्या भाषेत आहे. यात मला मोलाचे सहकार्य मिळाले ते धनुचे. त्यानेच नवीन तंत्रज्ञानानुसार ऑनलाईन असे हे पुस्तक बनवले. साहित्यिक आहे ना तो. आपल्या सर्वांना निश्चितच या आठवणी आवडतील अशी अपेक्षा करते.या आठवणी माझ्या असल्या तरी यात माझे सर्व गण गोत आहे. आईला केंद्रस्थानी ठेवून हा आठवणीचा गोफ विणला आहे.

आज आईचे वय ८० च्या वर आहे तरी सुद्धा तिचा उत्साह तरुणांना लाजवेल असा आहे. नातवंडे पतवंडे यांचे सतत कौतुक ..

" मनातलं ओळखणारी डोळ्यातलं वाचणारी

सुख असो वा दुःख सदासर्वकाळ प्रेम करणारी आमची आई"

तिच्यासाठी सर्वकाही....


आईला आरोग्यपूर्ण आयुष्यासाठी आभाळभर शुभेच्छा..

**- सौ.सुषमा कुलकर्णी बुद्रुककर, परभणी**

अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | आईचे माहेर | 6 |
| २ | आईचे आजोळ | 8 |
| ३ | १९५२ साल... | 11 |
| ४ | आईचा त्या काळातील प्रवास | 13 |
| ५ | सतीश दादाचे धुळ्यातील आजारपण | 15 |
| ६ | धुळे खानदेशातील वास्तव्य | 18 |
| ७ | अहमदनगर चे वास्तव्य | 21 |
| ८ | बालपणीचा काळ सुखाचा | 24 |
| ९ | आमचे परभणी चे घर (छोटे पण समाधानी) | 27 |
| १० | मामाच्या गावाला जाऊया | 31 |
| ११ | माझं कॉलेज जीवन | 33 |
| १२ | मावस भावंड आणि आम्ही | 38 |
| १३ | परभणी तील आमचं घर | 41 |
| १४ | माहेरचा वाडा (मांडाखळीकर) | 43 |
| १५ | आईचे बाल गोपाळ | 46 |
| १६ | आईचे कलाकौशल्य | 48 |
| १७ | अधिकाचा महिना | 51 |
| १८ | क्रांतीचौकातले परभणीचे दिवस! | 55 |
| १९ | आईच्या मैत्रिणी | 58 |
| २० | अम्मा गारू | 60 |
| २१ | सुषमाचे लग्न | 62 |
| २२ | मांडाखळी ची संक्रांत | 64 |
| २३ | नवरात्र | 66 |
| २४ | धनुचे लग्न | 70 |
| २५ | माझे आणि संगीताचा बाळंतपण! | 72 |

| | | |
|---|---|---|
| २६ | आईची बायपास सर्जरी | 75 |
| २७ | आमचे आजोबा ती. तात्या | 79 |
| २८ | आमचे बाबा | 83 |


**आईने ६ जुलै २०२२ रोजी काढलेली रांगोळी**

# १.आईचे माहेर

आईला माहेरी दोन बहिणी प्रेमा मावशी आणि सुमन मावशी तसेच तीन भाऊ! भाऊ मामा, दुर्गा मामा , आणि भास्कर मामा. लहान असताना आई व दुर्गा मामा एकाच वर्गात होते. एक दिवस मामा पुस्तक न्यायचा तर एक दिवस आई. कारण दोघात पुस्तकाचा एकच सेट असायचा. आज पुस्तक आणलं नाही म्हणून दुर्गा मामा छडी खायचा तर एक दिवस आई! त्यावेळी आजोबा परभणीला होते. मुलींना काय शिकवायचे? हा त्या वेळचा सामाजिक विचार होता. शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा तरी आई पाचवी पर्यंत शिकली. आई सांगते तात्यांच्या ऑफिसचे खाकी कागद असायचे एका बाजूने लिहिलेले व एकीकडे कोरे. या कागदांची आजोबा घरी शिवून वही बनवायचे . खूप कष्टाळू आणि आहे त्या परिस्थितीत समाधान मानणारी आणि त्यातून काय चांगल करता येईल हा विचार करणारी ही मोठी माणसं! आईचे अक्षर तर मोत्यासारखे सुंदर अजूनही ती लिहिते. तिच्या मैत्रिणी सांगायच्या "हिची वही सर्वात वर ठेवत असत बाई! आणि सगळ्यांना दाखवत. अक्षर असावे ते कुसुम देव सारखे! असं म्हणत" आईचे माहेरचे नाव कुसुम होते. तिला सगळेजण बाई म्हणत.तिचे पाठांतर खूप चांगले होते आहे.

अजूनही आईला तिच्या लहानपणीच्या सर्व कविता पाठ आहेत. आमच्या धनुने मला एक जुन्या कवितांचे संग्रह पुस्तक भेट दिले होते. यातील कवितेची एक ओळ म्हटले की पुढच्या वेळी पटपट आई अगदी बालपणात जाऊन त्यावेळच्या आठवणी सांगे. 'बा नीज गडे नीज गडे लडीवाळा...","पडू आजारी मौज हीच वाटे भारी " या कविता आजही तिला मुखपाठ आहेत.निमकी, दिडकी, पाऊणकी चे हे पाठांतर आज पन्नास वर्षांनंतर देखील तितकेच चांगले आहे. त्यावेळच्या आठवणी, केलेली मज्जा , झालेली फजिती आजही आम्हाला सांगते या गोष्टी ऐकायला तिच्या नातवंडांना देखील खूप आवडतात. तिच्यातले हे बालपण ही निरागसता अजूनही जपली. खूप उत्साही व्यक्तिमत्व! तिच्याकडे पाहिल्यावर

आपण उत्साहीत होतो. पदार्थ एवढे छान बनवते की विचारू नका. पुरण पोळी खावी तर आईकडूनच! सगळ्यांच्या आवडी तिच्या कायम लक्षात असतात. आता तर काय पणजी आजी झाली. पतवंडा साठी देखील निरनिराळे  पदार्थ सुचवत असते. आम्ही तर तिला गमतीने  म्हणतो तुला आजोबांनी शिकवले असते तर तुम्ही नक्कीच कलेक्टर झाली असती. खूपच हुशार ,सहनशील, समंजस आणि कर्तृत्ववान अशी आमची आई प्रमिला शामराव मांडा खळीकर. तिला सगळ्यांचे खूप कौतुक वाटते नवीन गोष्टीची तेवढ्याच उत्साहाने स्वीकारले अक्षरश: मोबाईल वरून तिने शिवलीला मृताचा अकरावा अध्याय वाचला तिच्या नात सुनेच्या डॉ मधुरा च्या मोबाईल वरून!



**आईने १ जुलै २०२२ रोजी काढलेली रांगोळी**

## २. आईचे आजोळ

आता आईच्या लहानपणाची गोष्ट आहे तिचे  आजोळ  सिल्लोड जवळ धावेड येथे होते. आईला पाच मामा आणि एक मावशी होती. हि मावशी आजीची अत्यंत लाडकी होती. आईच्या आजीला सगळेजण माई म्हणायचे आईचे सर्व भावंड धावडा आजोळी जायचे त्या ठिकाणी पूर्ण माडी वर कांदे वाळत घातलेली असायचे. घरचे कांदे!  तर मग उन्हाळ्याच्या सुट्टीत ही भावंड आजोळी जायचे. तेव्हा आई चे मामा, मावशी मस्त एकत्र धमाल करायचे. शेतात जायचे आमराई होतीच. रोज रोज आंब्याचा रस आणि घरचे कांद्याची भाजी आणि कांद्याचेच भजे असायचे. दुर्गा मामा म्हणायचा “रोज रोज कांद्याची भाजी कंटाळलो बुवा, दुसरी करा ना!” आजी आणि सगळे यावर पोटभर हसायचे. आजी त्यांना गोधडी वर बसवून खूप गोष्टी सांगायची. आई सांगते, त्यावेळी सकाळी नाश्ता करून म्हणजे पत्रावळीच्या पानावर गरमागरम भाकरी आणि लोणचे, लोणी आणि चटणी असे द्यायचे. एकाच फुलपात्रा तून सगळ्यांनी पाणी प्यायचे!  एक कळशी ते भरून ठेवलेले असायची आणि आम्ही  सगळे जण त्याच्या भोवती बसायचो. मनसोक्त नाष्टा करायचो. मुलं खेळायला गेले की आमची आजी स्वयंपाकाला लागायची. तोपर्यंत आजोबांची भल्यामोठ्या पूजेची तयारी केली जायची. नैवेद्य, वैश्य देव... त्यावेळी आजोबा दररोज एक गुळाचा खडा वाटीत नैवेद्याला ठेवायचे आणि जवळ असल्या बालगोपाळा पैकी कोणाला तरी एकाला तो प्रसाद मिळायचा. पूजा  होईपर्यंत आम्ही  वाट पाहत बसायचो आणि ज्याला तो गुळाचा खडा मिळणार त्याला खूप आनंद झालेला असायचा. त्यातूनच शिस्त/ एकाग्रता हे गुण वाढीस लागेले. देवपूजेचे महात्म्य तिथेच कळाले. कळत नकळत संस्कार होत असत मुलांवर त्याकाळी! सगळे एकत्र खेळण्याने खिलाडूवृत्ती व प्रेम आपोआपच वाढीला लागायचे! ना कुठले संस्कार वर्ग आणि ना कुठल्या आजच्या सारख्या जीव घेण्या स्पर्धा ! किचन टिप्स घरातून च मिळू लागत. सगळे जण आपल्या आई काकू आजी मावशी यांच्या हाताखाली

शिकायचे. मुली यातूनच सुगरण होत असत. हाच या काळातील संस्कार वर्ग असायचा. एकत्र कुटुंब पद्धतीचा फार मोठा आनंद लाभ मागच्या पिढीला मिळत होता.

आतापर्यंत आईचे श्याम मामा आणि मामी परभणीला राहत होते. माझ्या घराजवळ त्यांचे घर. आई आली की आम्ही आमच्या  आजोळी जायचो. मामा-मामी खूप आदरातिथ्य करीत. जेवायला नेहमी बोलवायचे. आमच्याकडे पण शाम मामा आणि मामी येत असत. त्यांना माझे फार कौतुक वाटायचे. आई हक्काने मामींना म्हणायची" मामी उडदाचे वरण करा बरं, खमंग धावेड सारखे!" मामी मग करायच्या. आईसोबतच  माझे आणि संगीताचे पण अतिशय प्रेमाने माहेरपण करायच्या. आता श्याम मामा आणि मामी दोघेही पुण्याजवळ तळेगावला त्यांच्या मुला जवळ राहतात. योगायोगाने काही वर्षापूर्वी धनुची मुलगी पूजा देखील तळेगावला राहत होती. त्यावेळी आई हमखास तळेगावला गेली की शाम मामाकडे जायची. श्याम मामा मामी आणि आई खूप जुन्या आठवणी करून गप्पा मारत बसायचे.  ते पाहून मला आणि धनूला इतकं बरं वाटायचं. आम्ही  बऱ्याचदा त्यांचे असे गप्पा मारतानाचे फोटो देखील काढलेले आहेत. आता शाम मामा , मामी, आई यांची वये ऐंशीच्या पुढे आहेत पण मामा आणि भाची मधील प्रेम /माया/आत्मीयता अजून देखील कायम आहे .




**आईने नोव्हेंबर २०२१ मध्ये दिवाळीत पुण्याला धनुकडे काढलेली रांगोळी**

## ३.१९५२ साल....

“आई दिव्याची ज्योत असते... तो प्रकाश परिवाराला मिळावा म्हणून ज्योतीचे चटके सहन करणारा दिवा म्हणजे वडील असतात!” हे वाक्य कुणी लिहिलं आहे माहित नाही पण ते एक त्रिकालाबाधित सत्य आहे. माझी आई..प्रमिला शामराव कुलकर्णी मांडाखळीकर. आज तिचे वय ८१ वर्षे आहे. पण आजही ती अखंड कार्यरत आहे. स्वयंपाकघर हे तिचं कार्य क्षेत्र. अजूनही पतवंडाचे लाड पुरवण्यासाठी प्रचंड उत्साहात काम करीत असते. थकवा , कंटाळा हे शब्द तिच्यापासून कोसो दूर आहेत. काय बोलू तिच्याविषयी? शब्द अपुरे आहेत माझे! तिचे उपकार फेडण्यासाठी एक जन्मही न पुरे नव्हे नव्हे सात जन्मही अपुरे पडतील. १९५२ साल! अवघ्या बाराव्या वर्षी आईचे लग्न झाले होते. काय कळत असणार या वयात. पण खेळण्या-बागडण्याच्या वयात लग्न ठरलं. आमचे दोन्ही आजोबा (आईचे वडील वासुदेवराव देव आणि बाबांचे वडील राजेश्वरराव कुलकर्णी) एकाच ठिकाणी नोकरीला. त्याकाळी त्याला करोड गिरी म्हणायचे आता त्याला सेल्स टॅक्स (आणि आता जीएसटी!) म्हणतात. आमच्या बाबाचे वय 19 वर्षे ते नुकतेच या ऑफिसमध्ये नोकरीला लागतात. मग काय ओळखीचे म्हणून आईचे वडील तात्या आणि बाबाचे वडील तात्यासाहेब लग्न ठरवतात. घरातील स्त्रियांचे मत फारसे विचारात घेतले न जाण्याचा तो काळ होता.१५ फेब्रुवारी १९५२ या दिवशीचा मुहूर्त ठरतो. याच दिवशी माझी चुलत बहिण दुर्गाताई (दत्ता काकांची मुलगी) हिचे हि लग्न याच दिवशी ठरते. काका , पुतणीचे लग्न एकाच मांडवात आणि एकाच दिवशी १५ फेब्रुवारी १९५२ रोजी झाले. आणि हे लग्न कुठे झाले माहिती आहे का? आपल्या मांडाखळी च्या वाड्यात! अन काय धमाल पहा , देव म्हणजे आईच्या माहेरची मंडळी उचलून नवरदेवाच्या गावी येतात! आई सांगते ना, आतासारखे कुठे मेकअप , साड्या, आणि मेहंदी! नऊवार साडी घालून ही बारा वर्षाची देवकन्या मांडाखळीकर यांच्या घरात सून म्हणून प्रवेश करते!अवघ्या बारा वर्षाची हि नववधू एका

मोठ्या कुटुंबात दाखल होते. आजोबांचा दरारा म्हणून, नऊवारी साडी घालते. आई म्हणते "कितीदा या नऊवारीच्या साडीत धडपडून पाय अडकून पडले ते माझे मला माहित!" मला तर आई कडून हे ऐकून 'स्वामिनी' या मालिके रमाबाई मधल्या छोट्या रमाबाई ची आठवण झाली. आई तशीच दिसत असणार! आज आमची आई ८१ वर्षाच्या वयाची आहे आणि कुतूहलाने नाती नातवांच्या च्या लग्नातल्या थाटमाट पाहून चकित होते. समाधानाने बघते आमच्या वेळी असे नव्हते हो असे बोलते. आज-काल काय छान नवरी नटवतात याचं तिला नवल वाटतं.

लग्न झाल्यावर दोन मावश्या, आमचा एक मामा हे तिळाचा महादेव खात पळवापळवी करीत असत असे आजोबा सांगत. खरं तर खेळण्याच्या वयातच हे सुंदरसे रोपटे मांडाखळी कर यांच्या घरात रुजले आणि त्यांचा वटवृक्ष झाला आहे. आजी म्हणजे माझ्या बाबांची आई आधीच गेली असल्यामुळे, थोडे दिवस रुक्मिणी काकू व सखाराम काका यांच्यासोबत राहते व नंतर स्वतःचा संसार थाटून आख्खं घर सांभाळते. अक्षरशः चुलीवर स्वयंपाक. पण आईच्या आईने म्हणजे आमच्या आजीने काही एक तक्रार केली नाही. एकदा मुलगी उजवली ना मग शिकेल ती आपोआप. आई स्वत:च स्वत:ची गुरु झाली आणि एकलव्या प्रमाणे शिकत गेली.विश्वासाने वाटचाल केली. एवढी छोटी मुलगी सगळे सगळे शिकली आणि ते देखील नऊवारी साडी घालूनच!




**आईने ५ जुलै २०२२ रोजी काढलेली रांगोळी**

## ४. आईचा त्या काळातील प्रवास

बाराव्या वर्षी आईचे लग्न झाले. हसण्या खेळण्याचे वय. पण संसार अंगावर पडला. वय लहान  म्हणून माहेरी पण खूप जावेसे वाटेल सहाजिकच होते ना. नेहमी आईला तात्या घ्यायला येत पण त्यांची बदली हैदराबादला झालेली. त्यावर्षी आईला एकटीला जायचे ठरले बाबांना पण सुट्टी नाही. दसरा झाला. आईने तयारी केली. काय करणार, छोटी मुले. मी आमचा सतिश दादा! आम्हा दोघांना घेऊन जायचे ठरले. वळकटी , फिरकीचा तांब्या पाणी प्यायला सोबत आम्हा  दोघाना  घेऊन आई निघाली. बाबांनी आईला परभणीहून बसवून दिले काचीगुडा एक्सप्रेस रात्रभर पूर्ण प्रवास होणार होता. सकाळी तात्या काचीगुडा येथे घ्यायला येणार असतात. गाडी निघाली. दोन लहान मुलांना घेऊन माऊली निघाली. मुलांना खाऊ घातले. हळूहळू लोक उतरून गेले. डबा जवळजवळ रिकामा होत गेला. पण एक वेडी बाई आईच्या डब्यात झोपलेली होती.  आई खूप घाबरली पण काय करणार! सतीश त्या बाईकडे जायचा तिच्या डोक्यावरचा पदर हळूच काढायचा! बापरे! किती भयानक. ती वेडी जोरात हसायची/खेकसायची! आईने तिला पोळी भाजी दिली. आणि हात जोडून तिला माझी मुले लहान आहेत त्यांना त्रास देऊ नको अशी विनवणी केली.  कोणतेही स्टेशन आल्यावर आई खिडकीपाशी जाऊन पॅसेंजरला “ओ मावशी इकडे या येथे खूप जागा आहे” असे म्हणून बोलावत असे. त्यांचे सगळे सामान स्वतः घेत असे. तेवढाच आधार ! अशावेळी या वेड्या बाईच्या सोबत रात्री आईने जीव मुठीत घेऊन प्रवास केला. रात्र संपून सकाळ होते काचीगुडा स्टेशन येते. तात्या आलेले असतात खूप आनंद होतो. असे अनेक प्रसंग आहेत.

घरी गेल्यावर सुद्धा आजीला आई खूप मदत करयची.  मातीची चूल घालून दे, संपूर्ण  घर सारवून दे, दिवाळीच्या फराळाचे जिन्नस करणार, लहान भावंडांना मातीचा किल्ला करून देणार!  भास्कर मामा पण आईची वाट पाहायचा. बाई येणार ,बाई येणार आधी दोन दिवस घर डोक्यावर घेणार. हैद्राबादला शेजारच्या काकू म्हणत “तुमची मुलगी आलेली पण दिसत नाही हो कधी बाहेर “ आई


माहेरी गेली की वाट:ला घर कामात गुंतवून घेत असे. कधीच बाहेर जाणार नाही सतत आईला मदत करणारी ही माहेरपणाला येते पण आईच माहेर पण करते!



## ५ . सतीश दादाचे धुळ्यातील आजारपण

धुळ्याला संजू आणि संगीता अगदीच लहान होते. जुळे होते. मी आणि धनु तसे फार मोठे नव्हतो. आणि सतीश होता दहा वर्षांचा. सतीश दादाची तब्येत त्यावेळी ठीक नसायची. त्याच्या चेहऱ्यावर कायम सूज यायची. त्याच्या पायात नवसाची बेडी घातली होती त्याचे नाव साईबाबा ठेवले होते. धुळे चे घर मालक व त्यांची बहीण धुळे शहरात पण थोड लांब राहत होते. एकदा त्या सहज आमच्या घरी आल्या आणि त्यांनी सतीश ला पाहिले त्या म्हणाल्या “हा मुलगा असा का दिसतो?” आईने सांगितले “ त्याच्यावर खूप उपचार झाले पण त्याच्या चेहऱ्यावरची सूज काही कमी होत नाही” त्या बाई म्हणाल्या “मी त्याच्यावर चांगला उपचार करून देईल पण त्याला रात्री माझ्या घरी झोपायला पाठवावे लागेल.” बापरे, काय वाटले असेल त्या माउलीला! आठ-दहा वर्षाचे लेकरू रात्री दुसरीकडे पाठवायचं परत त्यात त्या बाईना काही मूलबाळ नव्हतं. त्यामुळे आईची काळजी अजूनच वाढली. पण इलाज होतो म्हटल्यावर आई-बाबा तयार झाले. बाबा रोज रात्री नऊ वाजता सतीश ला सोडायला जायचे. ऑफिसमधून येता येता, बाबा नागफणी चे मोठी मोठी पाणी आणत ती तोडताना त्यांच्या हाताला खूप काटे टोचून जखमा व्हायच्या! पण तसेच घेऊन ते घरी यायचे. सतीश चे जेवण झाले की ते टांग्यात घेऊन सतीश ला त्या आत्या बाईकडे कडे सोडवायला जायचे. मग त्या आत्या तीन नागफणी ची पाने स्वच्छ धुऊन गरम करायच्या आणि ही गरम पाने सतीश च्या छातीला पाठीला बांधायच्या. एरंडेल तेल प्यायला द्यायच्या .घोड्याची लिद त्याच्या अंगाला चोळायच्या. त्याच्या हातापायाची बोटे खूप ओढायच्या. अंगाला मसाज करायच्या आणि सकाळी उठल्यानंतर त्याला गरम पाण्याने स्वच्छ आंघोळ घालायच्या. सकाळी त्याला गरम-गरम चुलीवर पानगा तयार करायच्या आणि मायेने खाऊ घालायच्या. आईला हे सर्व नंतर समजले. आई सांगते त्या खूपच मायाळू होत्या. पण त्या दिवसात आईला रात्र रात्र झोप यायची नाही. तिला झोपच लागायची नाही.

सतीश रात्री उठला असेल का? त्याला भीतीदायक स्वप्न तर पडले नसेल ना? तो घाबरला तर काय? अशा विचारांनी तिच्या डोळ्याला डोळा लागत नसते. पण मन घट्ट करुन काळजावर दगड ठेवून तिने सतीश वर इलाज केला. सकाळ झाली की , आई बाबांना लगेच त्याला आणायला पाठवायची. तेव्हा बऱ्याचदा सतीश ची अंघोळ चालू असायची. त्या त्याला खूप चोळून चोळून अंघोळ घालायच्या आणि त्याला गरमागरम पानग्याचा नाश्ता दिल्यानंतर त्याला बाबा घरी आणायचे. मग आईचे काम सुरू व्हायचे.  असे जवळपास 23 महिने उपचार झाले सतीश दादाची तब्येत एकदम सुधारली. त्या आत्याला बाबा पैसे देऊ लागले तर त्यांनी ते घेतले नाही. लेकराच्या उपचाराचे कसले आले पैसे ? असे त्या म्हणाल्या. मग आईने त्यांना एक सुंदर साडी दिली आणि तुमच्या भावाकडून ही भाऊबीज समजा असे म्हटले. परप्रांतात अशी देव माणसं आईला भेटत गेली त्यांच्या मुळे आपला  मुलगा बरा झाला यातच मला आनंद झाला. हे असे जुने आयुर्वेदिक उपचार सतीश ला त्या काळात त्या अनोळखी आत्याकडून मिळाले त्यांना माझा सलाम!  असे अनेक प्रसंगांना आई-बाबा सामोरे गेलेले आहे. ते म्हणतात आपण नेहमी चांगले करत राहावे म्हणजे कुठेतरी आपल्यासाठी चांगले घडत राहील.आमचे आई बाबा खरोखरच अजातशत्रू आहेत कुणाबद्दल कधीच वाईट बोलणार नाही. स्वतःच्या नोकरीचा पदाचा कधीही त्यांनी गर्व केला नाही. आमचे बाबा सेल्स टॅक्स डिपार्टमेंट ला क्लास वन ऑफिसर होते. पण त्यांचे राहणीमान अतिशय साधे होते. सर्वांशी ते अतिशय प्रेमाने नम्रतेने बोलत असतात त्यांना आपल्या मुलांचा सुनांचा जावयांचा नातवंडांचा खूप अभिमान खरोखरच आमचे बाबा देव माणूस होते.



**आईचे आवडते चित्र मोर. आम्ही सर्वांनी लहानपणी आईकडून पहिल्यांदा हे चित्र शिकलो!**


## ६ धुळे खानदेशातील वास्तव्य

बाबांची बदली १९६५ साली धुळे खान्देश ला झाली परभणीहून! पण त्यांचा स्वभाव प्रामाणिक पणे नोकरी करायचा होता. शासनाबाबत तक्रार नाही कुरकुर नाही. कुठेही जायचे पण तेवढ्याच उत्साहात आनंदाने काम करायचे. मग काय गेले धुळ्याला. खानदेशात आमचे नातेवाईक असे कुणीच नव्हते. आमच्या ओळखीपण कुणी नव्हते. आतासारखे फोन मोबाईल देखील नव्हते. आम्ही तीन भावंडे आई बाबा आलो धुळ्याला.चौदाव्या गल्लीत घर भाड्याने घेतले. या घरात पूर्वी एक खून झाला होता असे सांगायचे. घर चौदाव्या गल्लीत भाषा अहिराणी काही कुणाला समजत नसेल पण त्या त्या आईने ओळखी केल्या कटी बटी ची भाषा शिकून घेतली खास खानदेशी पदार्थ आईने शिकून घेतले तर त्यामुळे बाबांना वीस दिवस दौरा आणि दहा दिवस घरी असे काम ऑफिसचे. मला थोडे थोडे आठवते मी पहिलीत होते. त्यातच पुन्हा आईला डोहाळे लागले. अगदी कडक! तिकडून कुणीच बाळंतपणासाठी येऊ शकले नाही कारण आम्हाला दोन्ही आज्जी पण नव्हत्या! दुसऱ्यांनी कुणी यावे म्हटले तर त्यांच्या अडचणी! माझे मामा दुर्गादास मामा यांचे लग्न याच काळात होते मग काय बाबांनी कामासाठी तीन बायका लावल्या! बनुबाई स्वयंपाक करायला. बाळंतपणा च्या काळात देवाच्या रूपात भेटल्या. आईचे सर्व काम आईच्या मायेने करून दिले. आईला जुळे झाले. त्यातील एक मुलगा आणि मुलगी संजय आणि संगीता! संगीता ला सांभाळण्यासाठी बनुबाई! फारच प्रेमळ! आमच्या घरी यायच्या झोपायला! धुणीभांडी करायची तानुबाई! आई सांगते ना आजही त्या आठवणी. देवाने त्या बायकांना पाठवून नाही तर काय झाले असते देवाला माहित? देवाला सगळ्यांची काळजी. बाबा त्यावेळी दिवसभर ऑफिसमध्ये. आदिवासी बायका भीक मागायला यायच्या यांच्या गळ्यात माळा अंगावर छोटेसे धडके अंगावर गुंडाळलेले, कपाळभर कुंकू , लाल भडक मळवट ! त्याना पाहिले भीतीने जीव घाबरा घुबरा व्हायचा. पण या माऊली याही ठिकाणी आपल्या पाच पिल्लांना

घेऊन धैर्याने राहिली पण कधी तक्रार केली नाही. आज काल एका मुलाला सांभाळायचे तर काय कसरत करावी लागते सगळ्या घराला! आमचा सतीश दादा मात्र खूपच ग्रेट! तो लांबच्या शाळेत एकटा जायचा. तिसरीला. मुलगा उशीर झाला तरी फोन नाही , काही नाही. वाट पाहण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. काहीच नाही. जुळ्यांचे जुळे दुखणे रात्रंदिवस जागरण हेच कमी की काय आम्हा तिघांना त्यावेळी डांग्या खोकला झाला! बाबा दौऱ्यावर. बाळांना बरे नसल्यावर आई व बनुबाई दवाखान्यात जायच्या. किती कसोटीचे होते ते. आमची आई धन्य! आम्ही धुळ्याला असताना एकदा बाबा दौऱ्याला गेलेले घरात छोटी छोटी मुले आणि अचानक तार आली. आई तर खुपच घाबरुन गेली. आम्ही पण लहान .वाचता कोणाला येणार? तार इंग्रजीत होती ना! मोठी पंचाईत झाली. मग आईने सतीश ला रेशन दुकानदाराकडे पाठवले. की तिथे कुणी तरी इंग्रजी वाचणारे असतील म्हणून. साताठ वर्षाचा सतीश ती तार घेवून रेशन दुकानात गेला त्यावेळेस खरंच खूप लोक चांगले होते. ते काका सतीश ला घेऊन घरी आले. आमचे आजोबा तात्या साहेब हे मांडाखळी ला वारले अशी तार आहे असे सांगितले. बाबा त्या वेळी नंदुरबार ला दौऱ्यावर होते. सतीश पुन्हा त्या काका सोबत पोस्त ऑफिस मध्ये गेला आणि तिथून त्यांनी नंदुरबार ला तार पाठवली. बाबा आले. पण मांडाखळी ला पोचे पर्यंत तिसरा दिवस उजाडला. त्यांना वडलांचे अंत्यदर्शन नाही घेता आले. आता सारखे फोन मोबाईल नव्हते. तेव्हा तर तिकडे येऊन नोकरी करणे (खानदेश धुळे) येथे फार कठीण काम. पण आई-बाबांनी कधीही तक्रार केली नाही. बाबानी तर दौऱ्याचा कधी कंटाळा केला नाही. धन्य त्यांच्या करारीपणा ची आणि स्वाभिमानाची!

त्या काळची एक आठवण आई नेहमी सांगते. माझ्या मांडीवर संजू अन धनु च्या मांडीवर संगीता असे आम्ही चौघे घरी पाळण्यात बसलो होतो. सतीशने मोठा झोका दिला आणि खालून पाळण्याला लटकला. तर एकदम काड काड आवाज आला! आणि पाळणा पडला. दोरी तुटली. म्हणून पाळणा उलटा झाला.

संगीता सर्वात खाली. तिच्या अंगावर सर्वजण पडले. सतीश घाबरून घरातून बाहेर पळाला. आईने सगळ्यांना बाहेर काढले आणि सगळ्यांना जवळ घेतले असतील देखील विचारात घाबरत घाबरत घरी आला आईचा मार पडेल म्हणून तो घाबरून बाहेर थांबला होता आईने सगळ्यांना जवळ घेतले देवाच्या कृपेने कुणाच्या अंगावर सांगा ओरखाडा देखील उमटला नाही!हि गोष्ट असावी १९६८ सालची!



## ७. अहमदनगर चे वास्तव्य


आम्ही १९६९ साली अहमदनगर ला आलो तेव्हा मी तिसरीत होते. बाबांची बदली धुळ्याहून अहमदनगर ला सेल्स टॅक्स ऑफीस ला झाली. पण आम्ही आमचे घर नगर शेजारच्या भिंगारला घेतले होते. भिंगार आणि नगर यांच्या मध्ये एक भुईकोट किल्ला होता आणि एक सुनसान रस्ता होता. आम्ही वसगडेकर यांच्या वाड्यात 565, मुळे गल्ली भिंगार येथे राहू लागलो. खूपच प्रेमळ होत्या नगरच्या काकू . आईचे व त्यांचे खूप छान जमले होते. त्या पूर्वी आम्ही चिंचोरे यांच्या वाड्यात राहायचो. त्या काकू मात्र खूपच त्रास देत असायच्या. त्या अतिशय करड्या शिस्तीच्या आणि रागीट होत्या. पहिल्या महिन्याच्या 'अडचणी'ला तर चार दिवस त्या काकू आईला चक्क पिंपळाच्या झाडाखाली संजू आणि संगीताला घेऊन बसायला सांगत. तुमची मुले खूप खोड्या करतात. रडतात. आमच्या मुलांचा अभ्यास होत नाही अशी तंबी देऊन आमचं जिणं यांनी नकोसं करून टाकलं. पण हा आमचा वनवास लवकर संपला आम्ही वसगडेकर काकू यांच्या घरात राहायला आलो. या घरात आम्ही १९७५ पर्यंत रहात होतो. आम्हाला नगरच्या काकू , कुंदा मामी, अरविंद मामा, त्यांची मुलं संजू/ संदीप/ सचिन आमच्या घरातलीच वाटतं असायची. मग श्रावण महिन्यात आम्ही सर्वजण एक छानशी बुरानगर च्या देवी ला तर कधी केडगावच्या देवी ला अशा आमच्या सहली असायच्या. आमच्या समोरच्या मंगल ची आई इतर गल्लीतील मंडळी घेऊन ही मोठी ट्रिप व्हायची. भिंगार च्या भुलेश्वरला तर आम्ही दर सोमवारी जायचो . भिंगार टेकडीवर फिरायला जाणे खूप मजेत गेले ते दिवस. अरविंद मामा , पकू मामा आमचा अभ्यास घ्यायचे. शाळा भिंगार टेकडीच्या खाली असायची.



संक्रांतीला काकू आणि आई हलवा करायच्या.  समोरच्या भोसलेच्या अरुणा आणि शारदा घरी यायच्या. आई त्यांना छान साखरेचा पाक करून द्यायची. मग हळू हळू  सुंदर-सुंदर पांढरा काटेरी हलवा तयार व्हायचा. मला अजूनही आठवते आई कित्येक वेळेला सकाळी चार वाजता उठून हलवा करायची मला अजूनही आठवते पांघरूनातून  आम्ही थंडीच्या दिवसात आईकडे पाहायचो आम्हाला उठावं वाटत नसायचं आई  मात्र सकाळी स्वच्छ आंघोळ करून देवाची पूजा करून हलवा करताना दिसायची . एका वर्षी नगरला हळव्याचे  प्रदर्शन झाले त्यात आईचा पहिला क्रमांक आला होता. त्यावेळी तिथल्या पेपर मध्ये त्याची बातमी देखील आली होती. नगरच्या काकूंचे आणि आमचे संबंध इतके घनिष्ट झाले होते की काकूच्या बहिणीची नात म्हणजे आमची स्वप्ना वहिनी! स्वप्ना  आणि सतीश यांचे लग्न ठरवले अरविंद मामाने.  मैत्री चे रूपांतर हे नात्यात कधी झाले कळले च नाही.  मागच्या पंचेचाळीस ते पन्नास वर्षापासून आमचे वसगडेकर कुटुंबीयांची आजतागायत संबंधित आहेत. काकू गेल्या आता

पण त्यांच्या पुढच्या पिढी सोबत  देखील आमच्याशी चांगले संबंध आहेत. आमच्याकडील सर्व सुख दुःखाच्या प्रसंगी लग्नकार्याला वसगडेकर आवर्जून उपस्थित राहतात. नगरच्या काकू गेल्या त्या वेळेला आम्हाला आमची आजी गेल्याचं दुःख झालं. आमच्या बालपणीच्या संस्कार /खेळ/ शाळा या सोबतच भिंगार मधील वसगडेकर वाडा आमच्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. आमच्या जवळ संस्काराचे माणिकमोती आमच्या जवळ आहेत. ते वडीलधाऱ्यांचा आशीर्वाद आहेत. अजूनही आम्हाला पुण्याला जाताना किंवा पुण्याहून औरंगाबादला येताना नगर लागले की गाडीतून उतरून पटकन भिंगारला जावेसे वाटते.

२५ जून १९७५ रोजी आम्ही नगर हुन परभणी ला शिफ्ट झालो. आम्ही परभणीला येण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आईचा आग्रह आईचे म्हणणे असे होते की बाबाच्या सतत बदल्या होत राहणार दर तीन-चार वर्षांनी आपण घर बदलत राहिलो तर आपल्या मुलांचे शिक्षण कसे होणार आणि त्यामुळेच आईने हा एक धाडसी निर्णय घेतला बाबांनी सांगितले मी सोलापूरला आहे परभणीला आपले छोटेसे घर आहे तिथे तुम्ही कसे राहणार पण आईने सांगितले आम्ही कसेही राहूत पण आता एक स्थिर स्थावरता तर हवी आणि आईचा निर्णय किती योग्य होता ते आता समजते.



## ८. बालपणीचा काळ सुखाचा


आम्ही नगरला असतानाच एक आठवण सांगते. आम्ही वसगडेकर काकूंच्या घरात राहायचं त्या घराला त्यांची बैठक आमची बैठक यामध्ये पार्टिशन होते. तोच आमचा बोर्ड होता. त्यावर मी सतीश आणि धनु गणित सोडवायचे आकृत्या काढायचे चित्र काढायचो. मी आणि धनु तर पुस्तकातली चित्रे एक कार्बन घेऊन काढायचं त्याला रंगपेटी चे रंग देऊन वॉटर कलर मध्ये रंगवायचो व ते आमच्या बोर्डवर लावायचो! आई आमच्या कलेला किंवा प्रयत्नांना कधीही न रागवता प्रोत्साहन द्यायची, मदत पण करायची. आमच्या रंग पट्टीतील एखादा रंग संपला तर 20 पैशाला वडी मिळायची. ती आणायची व पुन्हा आमच्या रंगकाम सुरु. असं करता करता धनु खूप छान आकृत्या आणि चित्रे काढू लागला. मी आपली जेमतेम काढत होती.. सतीश दादा ने एकदा माझ्या दिवाळीच्या चित्रावर पिवळा रंग सांडला व हसू लागला व फटाक्यांची आग लागली असं म्हणून चिडवू लागला. तो आमच्या खूप खोड्या काढायचा.मोठा भाऊ म्हणून माया देखील करायचा. धनु व माझी घालायची एकच चप्पल होती . आम्ही दोघे म्हणून तिला वापरून वापरून पातळ केली. मग आम्ही चप्पल ची पोळी केली असे म्हणायचो. आम्ही पाच जण असल्याने भावंड खूप मजा यायची. गल्लीत तर खूप खेळायचो. लपा छपीच्या वेळी संडासात लपायचो. त्यावेळी बहुतेकांचे संडास बाहेर असायचे त्यातून लपायचे. बऱ्याचदा आम्ही यावरून कित्येकांची बोलणी आणि आईचा मार देखील खाल्ला आहे. चार पाच जण एकत्र आले की हा खेळ खेळायचो. लिंबू पाणी / खो-खो/क्रिकेट/ डबा ऐस पैस... उन्हाळ्यात चंपल/ सापशिडी /पत्ते / नवा व्यापार खेळायचो. उन्हाळ्यात खूप मजा करायची. बालपण कशाचे संस्कार वर्ग आणि कशाचा हॉबी क्लास! खेळत खेळत शिकलो. संगीता/ संजू/ नंदा या एकाच वर्गात! तेथे प्रत्येकाच्या घरासमोर ओटा असायचा. तिथे अभ्यास चालायचा. घोकंपट्टी करायचे! क रे कमळाचा ब रे बदकाचा ग रे गणपतीचा ! कसा बालचमू जोर-जोरात अभ्यास

करायचा. एकदा संजू संगीता पाटी दप्तर घेऊन अंकलीपी घेऊन लिहीत होते तितक्यात तिथे एक गाय आली आणि तिने संगीताचे अंकलीपी चे पुस्तक खाऊन टाकले . संगीता रडत-रडत घरात आली व आईला म्हणाली आता गाईला सगळे पाढे पाठ होतील का? किती निरागस असतं! नगरला संक्रातीला पतंग उडवायचो. सतीश घरीच पतंग आणि मांजा बनवायचा. त्याची सुरुवात दिवाळी पासून व्हायची. बंद पडलेले काचेच बल्ब साठवले जायचे. संक्रातीच्या आठ दहा दिवस आधी मग हे सर्व बल्ब खलबत्त्यात कुटायचे.त्याची वस्त्र गाल पूड करायची. मग शिरसी हा खळीसारखा चिकट पदार्थ शिजवायचा. मग या शिरसीत ती काच पावडर मिसळायची. मग कापडात हा चिकट गोळा धरून त्यातून धागा पास करायचा . दोन मोठे बांबू उभे करून त्याच्या भोवती हा मांजा गुंडाळायचा आणि कडक उन्हात वाळू द्यायचा . झाला मांजा तयार. पतंगासाठी रंगीबेरंगी ताव आणायचे . कात्रीने व्यवस्थित कापायचे. बांबूच्या कामाठ्या आणायच्या. खळ शिजवायची आणि रात्रभर जागून मस्त पतंग तयार करायचे. हि सर्व कामे सतीश मोठ्या प्रमाणावर करायचा. आई त्याला रागवायची काच हाताला लागेल वगैरे! पण तो मोठ्या प्रमाणावर पतंग बनवून आमची सर्वांची संक्रातसाजरी करायचा.मग पतंगाची काटा काटी त्यातून होणारी भांडणे मांजाने हात कापणे हे सार्व व्हायचेच. त्या वेळी गच्ची ची घरे . सर्व आकाश पतंगाने भरून जायचे. आईचा जीवाला मात्र कायम घोर असायचा. काटलेला पतंग पकडायला मुलं पळायची त्यातून कुणी खाली पडले तर ?

नगरला १९७२ साली मोठा दुष्काळ पडला होता. त्या वेळी पाण्याची खूप टंचाई असायची. एकजण डफलीवर गाणे म्हणणार यायचा. ‘आषाढ गेला श्रावण पावसापायी आले सर्वांचे मरण ...’ उंच स्वरात त्याने म्हणालेलं गाणं अजून लक्षात आहे. त्या पूर्वी १९७१ ला बांगला देशाच्या युद्धाच्या वेळी भिंगार लष्करी एरिया असल्याने तिथे संध्याकाळीच black out केलं जायचं. रणगाडे , ट्रक आणि शिस्तीत चालणारे सैनिक आम्ही शाळेच्या खिडकीतून पाहायचो.नगरला

एक कल्हई वाला दोन चार महीन्याने यायचा. त्याचे कसब बघत राहावे वाटे. पितळीच्या भांड्याला एका मिनिटात चकचकीत करणारा तो आम्हाला जादूगार च वाटे.

धनूच्या टाळू एकदा अचानक ला छिद्र पडल्याने त्याने पाणी पिले की नाकातून यायचं. बापरे आई-बाबा खूपच घाबरले! काय झालं असेल? देवाला सत्यनारायण कबूल केला. तिथे डॉक्टर सप्तर्षी होते. त्यांच्याकडे दाखवले. तर टाळूला छिद्र आहे असे त्यांनी निदान केले. पण डॉक्टर खूप हुशार त्यांनी ऑपरेशन शिवाय गोळ्यांनी हा आजार बरा केला. एकदा आईच्या कानात एक किडा गेला होता. तो आताच मारून गेला. पण आईला आठ दिवस प्रचंड डोकेदुखी आणि वेदनांचा सामना करावा लागला. या आठ दिवसात आई काम करीतच राहिली आणि या काळात तिने चक्क खल बत्त्यावर वर्षाभराचामसाला केला. पुढे छोटे ऑपरेशन करून तो मृत किडा काढून टाकला! किती किती समस्यांना या माझ्या माउलीने आणि बाबांनी तोंड दिले हे त्याचे त्यांनाच ठावूक . आई तर तेथील घराला स्वतःच्या हाताने रंग द्यायची. दिवाळीला डबे लखलख करून ठेवायची फळाचे तयार कधीच विकत आणले नाही धन्य ती माऊली आम्ही भाग्यवान आहोत असे आई-बाबा आम्हाला लागली देवा तुझे थोर उपकार.



## ९. आमचे परभणी चे घर (छोटे पण समाधानी)

मी दहावीला असताना आम्ही परभणी ला आलो. बाबांची त्यावेळी सोलापूरला बदली झाली होती. परभणीला मांडाखळी कर यांच्या वाड्यात आमची एक छोटीशी खोली होती. सुरुवातीला काही दिवस आम्ही रुख्मिणी काकूंकडे राहिलो. मग सतीश आई सोबत सोलापूर आणि नगर ला जाऊन सामान घेऊन आले. तोपर्यंत मी आणि धनु काकूंकडे राहिलो. सुरेखाताई चे लग्न झालेले नव्हते. एका खोलीतच माझे मॅट्रिकची वर्ष झाले. सतीश कॉलेजला. पत्र्याचे घर. मातीचे अंगण. घर सारखे सारवावे लागे. पण त्याही स्थितीत खंबीरपणे आईने घर स्वच्छ ठेवले होते आमचे पितळी डबे अतिशय सुंदर होते. दर महिन्याला ती स्वच्छ घासायची. मगच किराणा सामान येणार. त्या वर्षी पाऊस खूप होता आणि पावसात संपूर्ण घर गळायचे. रात्रभर आम्ही जागेच असायचो. रात्रभर पावसाची झड चालू असायची! परभणीच्या सुप्रसिद्ध बाल विद्या मंदिर मध्ये आम्ही चौघे शाळेत होतो. मी दहावीला धनु सातवीला तर संजीव संगीता तिसरीला. सतीश शिवाजी कॉलेजमध्ये पीयूसी ला होता. त्या काळात इतके घर छोटे असून देखील आमच्या मित्र-मैत्रिणींनी घर कायम भरलेले असायचे. धनु चा मित्र अनिल, बंडे, किशोर , हरी माझ्या मैत्रिणी शैला, अलका सतीश चे मित्र चिद्रवार, मुळावेकर, राजूरकर तर संजू संगीताचे देखील छोटे छोटे मित्र धनंजय पाठक, प्रणिता, सोनी सगळे घरी यायचे. मस्त खेळत असायचो. आमचे सर्वांचे मित्र तसे कॉमन होते म्हणजे माझे मित्र सतीशचे मित्र झाले तर सतीश चे मित्र कधी माझे झाले कळलेच नाही. घराचे अंगण मोकळे होते तिथे आम्ही विटी दांडू / क्रिकेट खेळायचो. बालपणीचा काळ सुखाचा म्हणतात ते खरेच आहे. आमचे हे सोबती आजही आमच्या सोबत आहेत. आईची सगळेजण आठवण करतात आणि परभणीला आले की आवर्जून भेटायला येतात.

याच काळात श्रावणामध्ये एकदा प्रचंड पाऊस आला आम्ही सर्वजण आम्ही सर्वजण अक्षरशः जागे होतो कारण घरात घोट्या इतके पाणी साचले होते.


घरात लाईट नव्हती. कंदिलात  आई आम्हाला सगळ्यांना घेऊन कॉटवर बसली होती. विजा चमकत होत्या. खूप जोराचा पाऊस चालू होता. पत्र्यावर थाड थाड थाड थाड थाड असा पावसाचा आवाज येत होता!  एक भयभीत करणारा वातावरण होतं पण त्या देखी त्या वातावरणात देखील आई आम्हाला पाच जणांना घेऊन बसली होती. तितक्यात वाड्यातून माझा चुलत भाऊ दिवाकर दादा आला बॅटरी घेऊन आणि तो म्हणाला “काकू, या पावसात इथे काय करता? चला  माझ्या घरी” आणि आम्हा सगळ्यांना घेऊन तो रात्री अडीच वाजता त्याच्या घरी घेऊन गेला सकाळी पुन्हा मी आमच्या घरात आलो तेंव्हा  घरात गुडघाभर पाणी साचले होते. त्या वेळेला आम्ही दिवसभर घरातले पाणी बाहेर काढत होतो. आमचे सर्व मित्र , दिवाकर स्वत: दिवसभर पाणी काढत होता. घरात सगळे चिखलाचा खच झाला होता पण त्याही अवस्थेत आईने पुन्हा एकदा जिद्दीने आम्हाला उभे केले आणि आमचे रुटीन सुरु झाले. माझे दहावीचे वर्ष होते. घरात लाईट नव्हते. पुन्हा दिवाकर दादा धावून आला त्याने मोठ्ठी वायर आणून त्याच्या घरातून कनेक्शन देवून आमच्या एका खोलीत लाईट आणले! तेंव्हा आमची छोटी खोली आअनन्दाने उजळून निघाली. माझ्या दहावीच्या परीक्षेचा अभ्यास मला लाईट मध्ये करता आला तो दिवाकर दादा मुळे!

पण आता  ठरवले की आता या घरात फार काळ राहता येणार नाही म्हणून आम्ही घर बांधण्याचा निर्णय घेतला. घरात पाच शिकणारी मुले आणि कमावणारे एकटे बाबा आणि त्यामुळे हे सर्व बजेट कसे जमेल याची चिंता आईला कायम असायची. पण निर्धाराने आम्ही निर्णय घेतला घर बांधण्यासाठी बाबांनी सांगली बँकेतून कर्ज काढले! त्या काळात आम्ही शास्त्री नगरला  अम्मा पारवेकर यांच्या घरी राहायला गेलो. आमच्या घराचे संपूर्ण बांधकाम उमर भाई ने केले. slab चे घर झाल्याने खूप आनंद झाला. या छोट्या घरात भास्कर मामा आणि तात्या खूप फटाके घेऊन दिवाळीला यायचे. या  छोट्या घरातच

मस्त दिवाळी केली होती. घरी सगळे फराळाचे पदार्थ, पुरणाची पोळी तात्यांना खूप आवडायची. माणसाचे घर मोठे नसले तरी चालते पण मन मोठे असावे लागते हे माझ्या माऊलीने ठरवले होते. बाबा दर महिन्याला पैसे पाठवायचे. 1-2 महिन्याला यायचे. अगदी काटकसरीने संसार केला आम्हाला खूप शिकवले. स्वतः पाचवी पाणी शिकलेली पण मुलाना  डॉक्टर इंजिनिअर शिक्षक बनवले. अम्मा पारवेकर यांचे व आमच्या इथे ऋणानुबंध काही वेगळेच यावर पुन्हा लिहीनच. अम्मा  आईबद्दल नेहमी म्हणायच्या “संतांचे लेकरू कधी न कुरू कुरु “  आणि हो आईच्या आतेभाऊ सुंदर राव  मामा आणि मालती मावशी व सुनिता हे आमच्या घरी कायमच यायचे त्यांच्या अटॅचमेंट विचारूच नका पूर्वीची माणसं अतिशय मायाळू. सरकारी दवाखान्यात मामा नोकरीला होते.

दवाखान्यात जाताना सुंदरराव मामा घरी येणार म्हणजे येणारच. त्यांच्या काही अपेक्षा नसायच्या फक्त एक भांडे पाणी प्यायचे पण जाता येताना यायचं काय कसं काय याची  चौकशी करायचे! आजकाल कोणी कोणाच्या घरी appointment घेतल्याशिवाय / फोन केल्याशिवाय जात नाही पण सुंदर मामा न चुकता आमच्या घरी यायचे. सुखदुःखात आम्हाला ते कायम सोबत असायचे. आम्हाला नागपंचमीला झाडाचे झोके खेळायला त्यांच्या घरी गोरक्षण ला पण घेऊन जायचे  ते आईला कुसुम बाई म्हणायचे!  आणि मामींना म्हणायचे  “चल कुसुम बाई कडे आज तिने मस्त कैर्याचे  लोणचं केलं आहे! “  एवढं प्रेम आणि माया मामा कडून मामा कडून आम्हाला मिळत होती की त्याची किंमत आम्हाला आज कळते त्यांची  मला अजुन खुप आठवण येते. आईने खूप माणसं कमावली होती पण अजूनही त्यांना जपलेल्या आहेत बाबांना खूप ऑफिसचे काम असायचे नसायचे त्यांना प्रमोशन मिळत गेले त्यांचा प्रामाणिकपणा कष्ट करण्याची तयारी आणि दुसरी बाजू आईने खंबीरपणे सांभाळली. म्हणून हा संसार संसाराचा रथ खूप छान पद्धतीने चालला खूप कमाल वाटते आम्हाला या दोघांची.  खूप कष्टात पण मोठ्या संस्कारांमध्ये आईने आम्हा सगळ्या भावांना


वाढवलं “**माझ्या चंदनी खोडाचा मंत्र झिजणे झिजणे उणे लिंपायाला झाली सुगंधाचे लेणे** ….’ असं आमच्या आई बाबां बद्दल म्हणायला हवा याच घरात माझा दहावीचा निकाल लागला आणि मी फर्स्ट क्लास मध्ये पास झाले त्यावेळी बाबांची बदली नांदेडला झाली होती माझा रिझल्ट तार पाठवून आम्हाला कळवला. त्यावेळी फर्स्ट क्लास मध्ये खूप जास्त वाटायचे आमचे अजूनही शाळेच्या बोर्डावर नावे आहेत.



## १०. मामाच्या गावाला जाऊया

आम्ही लहान असताना दर सुट्टीत मामाकडे जायचं म्हणजे जायचं त्या वेळी भास्कर मामा आमचा लीडर असायचा! सतीश, मी, धनु प्रमिला मावशीची शुभांगी, कल्पना आणि भाऊमामाचा मुलगा  राजू तोही हैदराबाद हून यायचा. मस्त धमाल करायचो मामाकडे. आमचा मामा व्हेटरनरी डॉक्टर होता. दिवसभर खूप गाई-बैल अनेक प्राण्यांची मामा कडे ये - जा असायची . त्यांना औषध द्यायचं, पहिल्यांदा बुक्की मारून सुई टोचायची आणि मग त्यात औषध सोडायचे! आम्हाला ते पाहून खूप मजा यायची. मामी पण आमचं खूप उत्साहाने आणि आनंदाने स्वागत करायच्या. एवढे भाचे मंडळी  आले म्हणून कधीही कंटाळा नाही की  काही नाही. त्यात त्यांचे ते हैदराबादचे अप्रतिम लोणचे! वा वा वा अजूनही त्याची चव जिभेवर रेंगाळते आहे. आयुष्यात इतकं सुंदर लोणचे मी कधी खाल्लं नाही. कधीकधी आई आणि मावशी यादेखील माहेरपणाला यायच्या. मग भाऊ मामा सगळे आले की अक्षरशः टोपलं भरून शेंगा काय, आंबे काय, टरबूज काय घेऊन यायचा सर्वांसाठी!  मामा जिथे जिथे म्हणून नोकरीला होता त्या प्रत्येक गावी म्हणजे रंजनी, कोडी, बदनापूर , लासुर अशा सर्व गावांना आम्ही मामाकडे गेलो. एका वर्षी तर संजू  संगीता अगदी नऊ महिन्याचे असताना आम्ही गेलो होतो. मामा त्यावेळी रांजणी  होता. प्रमिल मावशी पण आली होती. एवढ्या लहानग्या भाच्यांना मामाने त्याच्या खेडेगावात खूप छान सांभाळले.  सुट्टी संपली की आम्ही नगरला जायचो . आम्हाला खूप वाईट वाटायचं. महिना-दीड महिना एकत्र केलेली धमाल अगदी पटकन संपली असंच वाटतं. त्यावेळी मामाच्या गावातून स्टेशनवर  येण्यासाठी बैलगाडी असायची.  तिथून रेल्वेने जालना किंवा औरंगाबाद ला जायचे आणि तिथून बसने नगरला जायचे असा हा लांबलचक प्रवास दिवसभराचा असायचा पण त्यावेळी कशाचच काही वाटायचं नाही. धमाल-मस्ती हेच त्यावेळेस आमचं सुख होतं. एकदा परत येताना आम्ही सर्व भाचे मंडळी मावशी ,मामा असे वीस-

पंचवीस जण रांजणी  च्या रेल्वे स्टेशन थांबलो होतो. आमची गाडी नेमकी दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर येणार होती. एवढ्या सगळ्यांना रेल्वे रूळ क्रॉस करून जाणं अवघड होते कारण एक नंबर प्लॅटफॉर्म वर दुसरी गाडी येणार होती.  भाऊ मामाने चक्क स्टेशन  मास्तरला गळ घातली आणि आमची गाडी एक नंबर प्लॅटफॉर्म वर आणि दुसरी गाडी दोन नंबर  अशी आदलाबदल केली! आमचा मामा खूप ग्रेट होता!! तापट ही  खूप होता सगळ्यांना फटके द्यायचा. तितकाच प्रेमही करायचा. सर्वांचे खूप लाड करायचा. आमच्या मामाचे मन खूप मोठं होतं त्यांना मंगेश नावाचा एक मतिमंद मुलगा होता पण स्वतःचं दुःख बाजूला ठेवून तो  आपल्या भाच्यांच्या आनंदासाठी कायम झटत असायचा धन्य ती माणसं!



## ११. माझं कॉलेज जीवन

मी मॅट्रिकला प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले त्याचवेळी काकू / काका म्हणाले बस झाला आता शिक्षण ! पण आई मात्र स्वतः या गोष्टीला राजी नव्हती ती स्वतः फक्त पाचवी शिकली होती पण शिक्षणाचे महत्त्व ती जाणून होती आपली मुलं खूप शिकावीत यावर तिचा कटाक्ष होता तिच्या आग्रहाने तिने मला कॉलेजमध्ये घातलं सायन्स फॅकल्टी ला. ऍडमिशन झालं शिवाजी कॉलेज खूप लांब. एकच कॉलेज. त्यावेळी परभणीत माझ्या मैत्रिणी शैला अलका सोबत असायच्या. सकाळी कॉलेजला जायचं नऊ वाजता. त्या वेळी तव्यावरची मला गरम खरपुस पोळी खूप आवडायची. दुपारी पोळी-भाजीचा डबा घेऊन आम्ही कॉलेजला जायचो. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत कॉलेज असायचे. कधी प्रॅक्टिकल असेल तर आणखी उशीर व्हायचा. पण आईची इकडे खूपच घालमेल व्हायची. बोळी मधून सारख्या चकरा चालू असायच्या. मी आल्या नंतर तिचा जीव भांड्यात पडलापडायचा. मग मी म्हणायची "अगं काय काय एवढी काळजी करते? येणारच ना मी घरी." पण आई म्हणयची " तुम्हाला नाही कळणार?" खरोखरच त्यावेळची तिची अवस्था मला आज लक्षात येते. मन व्यथित होते. आई दिवसभर अखंड काम करायची. स्वयंपाक /बाजारहाट या सोबतच संजू संगीताचा अभ्यास. आपली मुलं कुठल्याही स्पर्धेत मागे राहता कामा नये याकडे आईचा नेहमीच कटाक्ष असायचा!

आमच्या आईला स्वयंपाकाचा कधी म्हणजे कधीच कंटाळा येणार आहे. रात्री दोन वाजता उठून तिला म्हटले आहे भूक लागली आहे आणि लगेच गरमागरम थालपीठ करून देणार! बाबांची नोकरी नांदेडला होती. ते रोज पहाटे सहा वाजता एलोरा एक्सप्रेसने जाण्यासाठी घरातून बाहेर पडायचे. रात्री साडे अकरा बारा वाजता घरी यायचे. रात्री बारा वाजता आई त्यांच्यासाठी कुकर लावून गरमगरम भात त्यांच्यासाठी तयार ठेवायची. पुन्हा सकाळी सहा वाजता आईचा डबा तयार असायचा. बाबांचा डबा झाला की लगेच आमच्या शाळा असायच्या. आमच्या

शाळेचा डबा देखील आणि लगेच तयार करून ठेवायची. सर्वांना चांगले पदार्थ खाऊ घालने या गोष्टीचे तिला अतिशय आवड. आत्ता गेल्यावर्षी आई पुण्याला धनु कडे असते त्यावेळी पूजा  कडे जाऊन तिने तिला गरमागरम पुरणपोळ्या खाऊ तरी घातल्या शिवाय तिचे मोठे दीर महेश ला देखील गरमागरम पोळ्या खाऊ घातल्या. आमच्या सर्व मित्रांच्या आवडी-निवडी आईच्या अतिशय लक्षात होत्या. धनुचा मित्र अनिल हा कधीच कारल्याची भाजी खात नव्हता. पण आईने त्याला एकदा सांगितले की तू माझ्या हातची एकदा 'कारल्याची भाजी' खा. तेव्हापासून 'कारल्याची भाजी' हे अनिल ची फेवरेट डिश झाली होती! सर्वांसाठी कायम स्वयंपाक घरात राहत हि अष्टभुजा खऱ्या अर्थाने अन्नपूर्णा होते. तिने कित्येक लोकांचे पोट तृप्त केले आमच्या सखाराम काकांकडे त्यांचे गुरू येत असत. गुरु सोबत अनेक शिष्यगण यांचा परिवार देखील असे. त्या सर्वांना आईच्या हातची पुरणपोळी आणि कटाची आमटी खूप आवडत असायची. त्यामुळे आई गुरु आणि त्यांचे शिष्य परिवार आले की मोठ्या भक्तिभावाने त्यांच्यासाठी 25 ते 50 पुरणपोळ्या करून ठेवायची आणि गरमागरम कटाची आमटी सोबत त्यांना त्या खायला द्यायची.


आईला स्वयंपाका सोबतच उन्हाळ्यात करायची कामे खूप आवडायची. त्यामध्ये कुरडया, पापड्या , वडे,  पापड , शेवया सर्वकाही घरीच बनवायची. आमच्या प्रत्येकाच्या घरी आई स्वतःच्या हाताने लोणचे अजूनही करून पाठवते. जूनमध्ये कैऱ्या घेऊन ,त्या स्वच्छ धुऊन , कोरड्या करून आई भरपूर लोणचे करून ठेवून प्रत्येकाच्या नावाच्या बरण्या करून ठेवत असे. त्या बरण्याना वरती घट्ट पांढरे स्वच्छ कपडा बांधून ती बरणी प्रत्येकाच्या हवाली करत असे. वर्षभर आईच ने केलेले लोणचे आम्हाला सगळ्यांना अजूनही पुरते. त्याचप्रमाणे शेवाया गव्हले तर पाच-पाच  किलो करून ठेवायची. अक्षरशः अफाट हाच शब्द योग्य राहील. मला आता आश्चर्य  वाटतं की एवढं सगळं काम, घरात कामवाली नाही, पाणी बाहेरून भरायचं, घरांमध्ये कुकर नाही, मिक्सर नाही!  सर्व काही हातानेच

करायचे. अशा अवस्थेतही सगळ्यांची  दुपारची जेवणं आटोपल्यानंतर क्षणाचीही विश्रांती न घेता लगेच शेवया किंवा गव्हले करायला लागायची. पाठ आणि मान एक व्हायची. पण पाच पाच किलो तयार करून ठेवायचीच! त्याप्रमाणे पापड लाटणे हा आवडता छंद होता. त्याचप्रमाणे साबुदाण्याची पापडी खूप छान करायची. त्यासाठी हिंगाच्या डब्याचे झाकण ती गोळा करून ठेवायची आणि मोठ्या निगुतीने ती साबुदाण्याच्या पापड्या करायची. या उपासाच्या पापड्या वर्षभर आम्हाला खायला मिळायच्या. मला नेहमी वाटत आम्ही दुसरा जन्म घेतला तरी तिच्या इतर रुचकर आणि आणि सुंदर असे जेवण आम्ही बनवू शकत नाही!

आईच्या या पाककौशल्याची दखल मराठी इ - टीव्हीवरील एका कार्यक्रमात देखील घेतली गेली. धनु च्या ओळखीचा एक दिग्दर्शक मित्र ईटीव्हीवर कार्यक्रम करत होता त्याने औरंगाबादला आमच्या घरी येऊन आईच्या हातच्या गडगिळे या पदार्थाची शूटिंग केले आणि संपूर्ण महाराष्ट्रात तो कार्यक्रम लोकप्रिय झाला! कुरडया करताना चिक आई थोडासा बाजूला ठेवायचे आणि तो वाळवून ठेवायची. भक्तीला तो चिक खूप आवडायचा. भक्ती मुंबईला गेल्यानंतर तोच चिक सोबत घेऊन जायची आणि ज्या वेळेला भूक लागेल त्याला तो चिकाचा वाळलेला चिक पाण्यात टाकून परत गरम करायची आणि तो चिक खायची. यात चिकाचा आई सुंदर असा मुंबईचा हलवा देखील खूप छान करायची. परभणीला आमच्याकडे दूधवाला जेव्हा कच्चे दूध आणून द्यायचा त्याच्या पासून बनवलेला खरवस खूप सुंदर पद्धतीने आई बनवायची त्याच प्रमाणे तिने बनवलेली शेंगदाण्याची गुडदाणी तिचे नातवंड देखील खूप आवडीने खातात. आज वयाच्या ऐंशीव्या वर्षी देखील तितक्याच उत्साहात आणि जोमात पदार्थ करत असते. गेल्यावर्षी आई पुण्याला असताना धनु कडे लोक डाऊन च्या काळामध्ये आई विविध पदार्थ त्यांना करून खाऊ घातले.  तिच्या हातची केलेले लोणचे, कोशिंबिरी, चटण्या इतक्या रुचकर असतात की त्यांचे नाव जरी आठवले तरी तोंडाला पाणी

सुटते.विशेष म्हणजे स्वयंपाक पाच माणसांसाठीचा असो व पन्नास माणसांसाठीचा आईच्या पदार्थाची चव सेम असते.
आमच्या संगीताकडे लिंबाचे झाडे आहेत त्याला वर्षात जवळपास 1000 लिंबू येतात आई तिथे गेली ती कायम ताज्या लिंबाचे लोणचे तयार ठेवते. या लोणच्याचे खूप प्रकार आईने केलेले आहेत. ह्या लिंबाचा रस काढून त्यात भरपूर साखर टाकून आई सर्व त्यासाठीचे कॉन्सन्ट्रेट तयार करते. सकाळ झाली की आई संगीताला "उठ लिंबू चिरून दे आपल्यालाच गोड लोणचे करायचे आहे उद्या काय ते मिरचीचे लोणचे करायचे आहे" असे सांगते.  हे सगळे लोणचे तयार झाल्यानंतर पुन्हा बरण्या भरून लोणची सर्वांकडे पाठवून देतेआईच्या सुना स्वप्ना,मीना आणि अंजू देखील आईच्या तालमीत चागंल्या तयार झाल्यात. त्या देखील आईच्या  लोणच्याच्या , तक्कूच्या फॅन आहेत. आमच्या मधुराला तर आईचे चे लोणचे खूपच आवडते. मी तर संगीता ला  नेहमीच गमतीने म्हणते तू 'संगीता लोणचे' असा ब्रँड तयार करून त्याचा उद्योग सुरू कर!
आई ज्या घरात असते त्या घरात एक चैतन्य असते. प्रत्येकाला ज्या गोष्टी आवडतात त्या त्या आई आठवणीने लक्षात ठेवून करते. अमितला हिरव्या टोमॅटो आणि खोबऱ्याची चटणी आवडते, पूजाला गुडदाणी आवडते, धनूला अळूची भाजी आवडते, भक्तीला चिक आवडतो, आदित्य ला चीच गुळाची आमटी आवडते , सृष्टीला खारोड्या आवडतात! प्रत्येकाची फरमाईश आई आवडीने पूर्ण करते. अंजू तर नेहमी म्हणते " काकूजी मुळेच माझे एमडी झाले!"  सृष्टी अगदी चार महिन्याच्या असल्यापासून आईने व बाबांनी तिला सांभाळले. माझे बी एड पण आईमुळे झाले. ती म्हणाली "अगं आठ महिन्यांचा तर प्रश्न आहे मी अमितला सांभाळते निर्धास्तपणे बी एड कर. शिक्षण कधीही कामी येते. शिक्षण पूर्ण  करून टाक." मला खंबीरपणे आईचा पाठिंबा मिळाला. उत्साहाने मी बी एड केले. पुढे मला बाबांच्या ओळखीने म्हणजे आमचे सेक्रेटरी साहेब साहेब बाबांचे खूप चांगले मित्र होते त्यामुळे ते बाबांना भाऊच म्हणायचे. साहेबांच्या मुलीचे

काम करायचे ते ठरवतात आणि माझे काम होते. या शाळेत मी त्यांना म्हटले की बाबा तुमच्यामुळे मला नोकरी लागली . धनु चे आणि सतीश चे कित्येक मित्र एमपीएससी यूपीएससी च्या परीक्षा देत असताना त्यांना रात्री बेरात्री कधीही सर्टिफिकेटवर सह्या लागत असल्यास तर बाबा ताबडतोब सह्या करून देत असत. अगदी रात्री अकरा साडेअकराला तरी कोणी आले की काका मला उद्या फॉर्म पाठवायचा आहे तुमची सही पाहिजे तर बाबा लगेच त्याच्यावर सह्या करत असत!




## १२. मावस, मामे भावंड आणि आम्ही

"अगं मावशी, आम्ही येणार परभणीला आता सुट्टी मध्ये. आम्हाला खूप आवडतं तुझ्याकडे यायला! असे पत्र शुभांगी आणि कल्पना या माझ्या मावस बहिणी पाठवायच्या . भास्कर मामा पण त्यांच्या सोबत असायचा. आमचा ग्रुप होता फिरण्यासाठी. दुर्गा मामा पण गावात म्हणजे ममता कॉलनी राहत असल्याने सुट्टीत धमाल यायची. उन्हाळ्याच्या सुट्टीत सर्व एकत्र यायचो . मस्त मज्जा यायची. सांगवीकर यांचे अंगण त्या वेळी मोकळे होते. घरात आम्ही पाच जण भावंडांसोबत हि मावस मामे भावंड असे नऊ-दहा मुले स्लॅब झोपायचो. घर होते पण पायऱ्या उंच होत्या. आईच काळीज आमच्यासाठी गरम पोळ्या आणि घरी बनवलेला गुळांबा कसा करायचा? मग आईचे काही उन्हाळी कामं कुरडया पापड्या वळत घालण्यासाठी लाकडी शिडी चढून यायची! तेवढी कसरत... चिकाची गरम पातेली , ताटं, वळत घालायची साडी हा सगळा सरंजाम घेवून शिडीने स्लॅबवर चढायचे.(त्या वेळी जिना नव्हता.) अशा आठ-दहा वर खाली चकरा होत. आम्ही हाताशी असायचो पण मुख्य भूमिका आईचीच असे. असे वाळवण करण्याची डेंजर कसरत. पण एकाही वर्षी आईने कंटाळा नाही केला नाही. आंब्याचा रस करायचा तर स्वतः आंबे आणायला जाणार. सगळ्यांसाठी रस करणार. रस करायचा ,कुरडया पापड्या तळायचे केवढा उत्साह होता!

कल्पना, शुभांगी , संतोष आता सांगतात." आम्ही काय धमाल करायचो. परभणीच्या खूप कडक उन्हाळ्यात मावशी दोरीवर ,दरवाज्यावर चादरी ओल्या करून टाकायची व सर्वांसाठी घरगुती एसी चे वातावरण करायची! त्या पडद्यावर सतत पाणी टाकणार गारेगार वातावरणात पोळ्या खाऊन झोपायचो. पण ही माऊली आपले काम करतच रहायची. बाबांना सतत ऑफिस , दौरे असल्याने आम्हा भावंडांना आईने लहानपणापासूनच शिस्त लावली. बाजारातून जांभळं , बोरं काहीतरी आणले तरी ती मोजून स्वच्छ धुऊन आम्हाला देणार.


संतोष आमच्याकडे पाचवीला शिकायला होता. हे तिघे संजू ,संगिता , संतोष एकाच वर्गात होते.  त्यांच्या अभ्यासाची काळजी घेणे ,तब्येतीची काळजी घेणे हे सगळे करताना ते अत्यंत प्रेमाने मायेने करायची. माझ्या कुटुंबापेक्षा कोणतेही धन मोठे नाही असे म्हणायची. निसर्गाच्या ऋतूचक्रा सोबत जिव्हाळा याला आईने फार जपले होते. पैसा कमी, घर छोटे पण मनातील प्रेम मोठे! सर्वांसाठी ती  नेहमी आकर्षण केंद्र होते. त्यामुळे आमच्या घरी येणार यांना खूप करमायचे. आमचे कित्येकांचे मित्र/मैत्रिणी घरी येवून रहात त्यांना स्वत:च्या घरा सारखे आमचे घर  वाटायचे, ते आईच्या आपले पणामुळे !
घरातल्या घरातच मग कधी इडली-सांबार, उत्तपे असे पदार्थ आवडीने करायची प्रत्येक काम एवढे स्वच्छ नीटनेटके नंतर आमच्या घरात वर हॉलमध्ये जाण्यासाठी पायऱ्या बांधल्या त्या पायऱ्यांच्या खाली जागा होती तिथे ती एवढी रोज घासून खराट्याने स्वच्छ करायची व तेथे अतिशय सुंदर चकचकीत असे पाण्याचे घर बनवले होते तेथे स्टीलचे पिंप, हंडे ,कळशा, बादल्या, दोन काळेभोर माठ ठेवायचो. अधिक थंडगार पाणी कधी मिळणार म्हणून येणारे-जाणारे त्या जागेला पाण्याचे घर म्हणायचे. धनु आणि मी दरवर्षी वाड्यातल्या काकू आई सोबत बालाजी मंदिरात लागलेले भागवत ऐकायला जायचो आषाढ महिन्यात. आम्हा सगल्यांना डबे घेऊन शाळेत  पाठवायचे. सगळे काम करायची. एक वाजता फक्त पोहे, उपमा कधी फळं खाऊन भागवत ला जायची . मग पाच वाजेपर्यंत येणार मग वरणाला फोडणी वगैरे देऊन एकदा जेवायला बसणार त्यावेळेपर्यंत आम्ही कोणीतरी तिच्या सोबत जेवायला तयार! परत संध्याकाळी स्वयंपाक हे रहाटगाडगे सतत चालू होते. काय बोलू आईविषयी? शब्द आहेत माझे अपुरे तिचे उपकार फेडण्यासाठी एक जन्मही न पुरे एक जन्मही न पुरे!



## १३. परभणी तील आमचं घर

परभणीला आमचं घर मांडाखळी कर वाड्यात होती आमच्या घराला येण्यासाठी दोन एन्ट्री पॉईंट होते. एक तेली गल्ली तून आमच्या घरात सरळ येता येत होतं. दुसरा नानलपेठ मधून  आमच्या घरात जिना चढून पुन्हा उतरून येता येत होतं. परभणीला दुर्गा मामाने ममता कॉलनी मध्ये घर घेतलं. आपली मोठी बहीण याच शहरात आहे, म्हणून दुर्गा मामाने परभणीला घर घेतले. माझं लग्न ठरताना मामा अगदी पाहण्याच्या कार्यक्रमापासून सोबत असायचा. मामा ची मुले माधुरी, सविता आणि सुधीर आम्ही सर्वजण खूप मजा करायचो सणावाराला पाहुणे आले की काही दिवस ममता कॉलनी आणि काही दिवस आमच्याकडे असा त्यांचा मुक्काम असायचा. नणंद भावजय यांचा देखील खूप छान जमायचं. आमच्या नीलिमा मामी खूप आवडीने सर्वजण आल्यावर करायच्या. लग्नानंतर काही दिवस मी सेलू ला राहिले आणि नंतर आम्ही परभणीला मामाच्या घराजवळच गजानन नगर मध्ये आमचे घर बांधले. मग मामा मामी चा खूप सहवास मला लाभला. माझी शाळा तर मामाच्या घराच्या मागेच असायची. मी सूत्रसंचालन करायला लागले की मामा  अंगणात बसून खुर्ची टाकून सर्व ऐकायचा आणि मला शाबासकीची थाप द्यायचा. महालक्ष्मी सणासाठी भास्कर मामा , नंदा मामी यायचे. उन्हाळ्यात सविता माधुरी यायच्या. खूप छान दिवस होते ते. मग आमच्या इकडे मस्त मैफल जमायची. सुंदरराव मामा, मामी, सुनिता, उषा मामी, मालती मावशी  ...सगळे एकत्र यायचे आणि गप्पांना उधाण यायचे. सुंदर राव मामा दुर्गा मामाला देव साहेब असे म्हणायचे. कधीकधी मावशी आणि काका देखील यायचे. सगळ्या पाहुण्यांनी घर अगदी भरून जायचं आणि खूप आनंद वाटायचा. मग आम्ही मांडाखळी ला शेतात जायचो. मामा मामीला आणण्यासाठी माऊली बैलगाडी घेऊन यायचे नंतर संजू चे लग्न झाले १९९५ साली आणि काकूजी आणि बाबांना औरंगाबादला जावे लागले. सृष्टी अगदी लहान असताना तीन महिन्याची होती. त्यावेळी आई बाबा औरंगाबादला

गेले. त्यावेळी मला खूप वाईट वाटले पण मामाने सांगितले आई-बाबांना तिकडे जाणे गरजेचे आहे सृष्टी लहान आहे ना आणि आम्ही आहोतच नाही ते तू कशाला काळजी करते? मामा मामी ने आम्हाला कधीच अंतर दिलं. त्यांच्याकडची नरसिंह जयंती सोहळा फार छान असायचा. मामी एक महिना उपास करायचेच्या. खूप लोकांना जेवायला बोलवायचे नंतर सुधीर चे लग्न झाले. श्री घरात आली. तरी आमचे पहिल्यासारखे जाणे-येणे असायचे. श्री पण आमच्या छान मिसळून गेली. बाबा मांडाखळी ला जाण्यासाठी यायचे; तेव्हा मामा आणि बाबा दोघेही रिटायर झाले होते आणि ते मस्तपैकी पत्ते खेळायचे. अगदी निरपेक्ष आनंद घेत ते जगायचे. दुर्गा मामा रोज बालाजी मंदिरात जायचा. आयुष्यभर मामा सायकलवर फिरत असायचा. हे असं सगळं चांगलं चालू असताना मामा आजारी पडला आणि त्याला सुधीरकडे औरंगाबादला जावे लागले. मामा मामी घर सोडताना मला खूप वाईट वाटले. मला तर वाटले काकूजी बाबा  औरंगाबादला गेले आता मामा पण चालले. पण काय करणार? जावे तर लागतेच. अशा खूप साऱ्या आठवणी मनात फेर धरतात. दुर्गा मामा, भास्कर मामा, आमच्यावर मायेची पाखर करणारे आमचे बाबा  ही मंडळी होती. हे दोघे खूप लवकर गेले. आता आठवण फक्त काढायची. जुन्या गोष्टीचा  हा आमचा खजिना आहे. यावरच आमची पुढची वाटचाल चालू आहे.




## १४. माहेरचा वाडा (मांडाखळीकर)

आमचा खूप मोठा मांडाखळी करांचा वाडा परभणीला नानलपेठ मध्ये आहे त्या वाड्यात आमच्या सर्व काका काकू राहत. विश्वनाथ काका ,शंकर काका, दत्ता काका आतल्या वाड्यात तर आम्ही प्रभाकर काका, नारायण काका, सखाराम काका आणि आम्ही मागच्या वाड्यात राहत होतो. पैकी नारायण काका व प्रभाकर काका यांची घरे शास्त्री नगरला त्यांनी बांधली. आणि त्यांनी त्यांची वाड्यातली घरे सिंगणापूरकर यांना विकून टाकली. मग तेही कुटुंब आमच्यातले झाले. खूप मजा यायची. नवरात्रात तर रुक्मिणी काकूकडे मोठे घर म्हणून नवरात्र तिथे असल्याचे छान आरत्या म्हणायच्या. सगळ्या आरत्या लहानपणी आम्ही इथेच शिकलो. आशाताई आणि रावसाहेब भाऊजी इथेच राहायचे. महालक्ष्मीच्या वेळीदेखील कोणाच्या महालक्ष्मी आधी बसली आहे याची शर्यत असायची. सख्खे चुलत असे शब्दच आम्हाला माहीत नव्हते. ना कधी शिकवले गेले. काकू आहेत बस. ही बहिणीसारखी ओळख. सखे का चुलत हा शब्द आम्हाला कधीच माहीतच नव्हता. बालपण आम्ही खूप छान उपभोगले. गुंडू कुसुम ताई त्याचा मुलगा पण आमच्या वाड्यात च जास्त असायचा. मांडाखळी ला नवरात्रात जायचं बैलगाडीने. परभणी ते मांडाखळी चार गाड्या निघायच्या वाड्यातून. आई खूप दशम्या ,धपाटे, चटण्या ,लोणचे सोबत घ्यायचे. मग रात्री मुक्काम प्रभाकर काका यांच्या शेतात विहीर म्हणून तेथे करायचा. रात्री काकू कंपनी मस्त गरम गरम खिचडी करायच्या व सोबत चा डब्बा खायचा. रात्री शेतात निवांत झोपायचे. सकाळी उठून विहिरीवरच थंड पाण्याने स्नान करून मग माळावरच्या देवीला निघायचे. मोठी मंडळी इंद्रायणी देवीला वेढा घालायचे. खूप मोठी प्रदक्षिणा असायची . संपूर्ण डोंगराभोवती! ४-५ कि.मी. चा परीघ असेल. वाटेत काटे, चिखल...वर डोक्यावर कडक ऊन! आमच्या बाबांनी वयाच्या ७५ व्या वर्षी पर्यंत वेढा घातला. आम्ही मुलं गाडीजवळ खेळायचो. मस्त यात्रा भरलेली असायची. इंद्रायणी देवीला आईने किती तरी वर्ष हा वेढा घातला त्यात

खंड कधी पडला नाही. केवढी श्रद्धा होती. वर  तळपते ऊन आणि पायात चप्पल नाही काटे दगड खडबडीत रस्ता पण न थकता न कंटाळता ही मंडळी अतिशय उत्साहाने देवीला त्या पर्वताला वेढा घालायची तीन तास लागायचे. मग तेथेच किंवा आमच्या शेतात जाऊन परत जेवण करायचे नंतर मस्त चुलीवर माऊली ची बायको कौसाबाई  भाकरी करायच्या एक छानसा वास त्या भाकरीला असायचा. ते दिवस खूप मजेचे होते गेले ते दिवस राहिल्या त्या फक्त आठवणी. आजही आईबरोबर आम्ही याची नेहमीच चर्चा करतो व त्यात कितीतरी वेळ रमतो. मोरपंखी दिवस गेले उडून आता आम्ही खूप मोठा झालो पण ती ओढ अजूनही कायम आहे. आपल्या गावच्या मातीची नाळ आपल्याबरोबर सतत जोडलेली असते. बाबा औरंगाबादला राहायला गेले; पण त्यांनी मांडाखळी, परभणीला येणार कमी केले नाही. बाबांचा औरंगाबाद हून  मला फोन आला की मला खूप आनंद वाटायचा. “ताई  मी यायलो बर का आज संध्याकाळी हायकोर्ट गाडीने परभणीला!” असे म्हटले की मला खूप आनंद व्हायचा. बाबांसोबत काकूजी म्हणजे माझी आई असली तर खूप बरं वाटायचं पण आईला प्रत्येक वेळी यायला जमत नव्हते कारण सृष्टी आणि आदित्य लहान असायचे. कधी कधी सतीश देखील बाबांसोबत यायचा. शेतीकडे जाणे म्हणजे बाबांसाठी एक टॉनिक असायचे. शेवटपर्यंत त्यांनी शेती केली. त्यांना खूप करमणूक होती शेतीची. कुणी त्यांना कधी अडवले नाही. आईला काळजी वाटायची बाबांची पण आम्ही  आईला म्हणायचो  “जाऊ दे बाबांना. त्यांना आनंद मिळतो ना. नुकसान फायदा हा नको विचार करायला!”


आता आमची घरं मोठी पण माणसं कमी हेच चित्र दिसते सगळीकडे. काय करणार? लक्ष्मी काकू यांचे सुंदर भजन मंडळ होते. नवरात्रात तर प्रत्येकाच्या घरी भजन व्हायचे. आम्ही मात्र आटवलेले  दूध कधी मिळते याची वाट पहायचो. अशा कितीतरी आठवणी आहेत वाड्यातल्या!



## १५. आईचे बाल गोपाळ

आम्ही नगर हुन परभणी ला आलो तेव्हा संजय संगीता दुसरीला होते. बाल विद्या मंदिर शाळा घराच्या अगदी जवळ होती. आई त्यांना सोडवायला सुरुवातीला जायची. तर मग गल्लीतली  आणखी काही मुले आई सोबत शाळेत जात. त्यात राणी ,माधुरी, बंडू पण जायचे. मग नंतर आईला शेजारच्या सिंगनापूरकरकाकू म्हणायच्या  "आम्ही तुमचे एखादे काम करतो पण आमच्या मुंटी तुम्ही शाळेत जायची सवय लावा!"   यानंतर वाड्यात कोणत्याही लहान मुलाला शाळेची गोडी लावण्याचे फार मोठं काम आईने केले होते. कधी गोड बोलून कधी रागावून. कधी त्याच्याशी खेळत खेळत बोलत बोलत त्याला आई शाळेत घेऊन जायची! त्यामुळे आज बरेच जण आई मुळे आम्ही शाळेत जाऊ शकलो हे सांगतात. मध्यंतरी शार्वी च्या हातून आईला फुल वाहण्याचा कार्यक्रम होता." त्या कार्यक्रमात आमचा भाचा जो आता परभणीला तहसीलदार आहे त्याने स्टेजवर येऊन सांगितले की मी केवळ काकूजीने मला शाळेत जायची गोडी लावल्यामुळे आज इथवर पोहोचलो आहे!" आणि नंतर पुन्हा तो आईकडे वळून म्हणाला "काकूजी आज तुमची परत आम्हाला गरज आहे कारण आमची लहान मुले शाळेत जायला खूप नाखूष असतात!" आमच्या मांडाखळीकर वाड्यात त्यावेळी देशमुख बाई होत्या  त्या आईला म्हणायच्या "तुमच्या पोळ्या मी करते पण आमच्या शम्मीला फक्त शाळेत जायला तयार करा!"  आईच्या हस्तेच बरीच नातवंड, पुतण्या, शेजारच्या भाच्या शेजारच्या वाड्यातली मुलं यांच्या शाळेचा श्रीगणेशा होतो. अजूनही सगळ्यांना त्याची आठवण होते. आईने खूप मुलांना शाळेत जायला भाग पाडलं आणि सर्व मुले डॉक्टर इंजिनिअर आणि इतर चांगल्या  क्षेत्रात चमकत आहेत. मी कधीकधी विचार करते की आईने भूमिका ही किती समर्पकपणे पार पाडला आणि त्या यशस्वीपणे पूर्ण देखील केली. अगदी खंबीरपणे अमितला पण सोडायला आई जायची जबरेश्वर च्या शाळेत आम्ही तेथे कमलाबाई जवळ बसायचा. आमच्या अंगणात सगळे जण

जमायचे खेळायचे आणि त्यांना खाऊ द्यायची खेळात भाग घ्यायची . यात वर्षा, विवेक, केदार, शैला, अलका, संतोष ,गिरीश, राणी, चंदू, ज्योती ,प्रशांत, प्रदीप, प्रणिता .... असे सर्वजण आमच्या अंगणात कायम हुंदडत असायचे. त्यांच्या आया बिनधास्तपणे घरी काम करायच्या. काकू जवळ मुले खेळत आहेत ना मग काही काळजी करायची गरज नाही. विनया वहिनी तर अजूनही या आठवणी काढतात "विठु माझा लेकुरवाळा संगे गोपाळांचा मेळा " अशा प्रमाणे काकूजी लहान मुलांमध्ये असायच्या. आम्हाला तर वाटते करी मनोरंजन करी जो मुलांचे नाते जडे प्रभूशी तयाचे! या सर्व मुलांना आईने कागदी वस्तू बनवायला शिकवल्या. खेळ भांडी शिकवली. मातीची भांडी बनवायाला शिकवली. बाहुला बाहुलीचे लग्न आमच्या घरी व्हायचे. इथेच छोट्या अंगणात सगळे बाल सेना मोठी झाली. आजही सगळेजण काकूजीना खूप मानतात. त्यांचा खूप आदर करतात. आईने माणसं खूपच घडवली ,कमावली आणि सांभाळली. यात आईला धन्यता वाटते. शेजारची मुले येतात गोंधळ घालतात. भांडतात. दुपारची झोप मोडते. पाणी सारखे पितात. भांडी परत परत घासावी लागतात. ही सगळी कामं विना तक्रार केली .कधीच कोणाची तक्रार नाही. धन्य ती आई आणि धन्य ते बालगोपाल. आईचे हेच गुण आमच्या धनु आणि संगीतामध्ये देखील आले आहे तेही कायम मुलांच्या मध्ये रमत असतात आणि त्यांचे मनोरंजन करत असतात.




## १६. आईचे कलाकौशल्य

आम्ही नगर ऊन परभणी ला आलो त्यावेळेस संजू संगीता दुसरी ला होते ते मी दहावीला सतीश कॉलेजला आणि धनु सातवीला होता. आमचे शाळेचे ॲडमिशन दुर्गाताई चा मुलगा मधु याने बाल विद्यामंदिर या नामांकित शाळेत करून दिले. त्यावेळी मुख्याध्यापक पोटेकर सर होते. आमचे सर्वांचेच मार्क्स  चांगले होते म्हणून त्यांनी आमची प्रगती पुस्तके ठेवूनच घेतली. आमची तेव्हापासून शाळेशी जी प्रेमाची गट्टी  जुळली ती अजून देखील कायम आहे. संजू ने कधीही पहिला नंबर सोडला नाही. प्रत्येक वेळी बोर्डावर त्याचे नाव घ्यायचे. संगीताला देखील चांगले मार्क असायचे. चौथीच्या स्कॉलरशिप जिल्ह्यात पहिला मध्ये सातवीच्या स्कॉलरशिप मध्ये जिल्ह्यात तिसरा , दहावीला बोर्डामध्ये पहिल्या तिसात संजू चे नाव होते! आमच्या घरातील नाही तर घराण्यातील हुशार मुलगा! आम्हाला संजू  चा खूप अभिमान होता. ट्युशन वगैरे काही नाही. आई घरीच शिस्तीत अभ्यास करायला लावायची. काही पाठांतर करून घ्यायची. म्हणी , विरुद्धार्थी शब्द , नात्यांचे प्रश्न या गोष्टी आमच्याकडून करून घ्यायची. आईला वाचनाची खूप आवड होती. श्रावणामध्ये आई कहाण्या वाचून दाखवायची. यामुळे आम्हाला नकळतपणे वाचनाची गोडी लागली . आमच्या घरात सर्वात सुंदर अक्षर आईचे होते. तिचे इतके चांगले अक्षर आमच्या कोणाचेही नाही. परभणीला आईवर खूपच जबाबदारी पडायची. एकतर बाबा सोलापूरला किंवा नांदेडला होते. त्यामुळे घरातलं सगळं सामान आणणे,  मुलांचे आजारपण, नातेवाईकांचे येणे जाणे  हे सर्व एकट्या आईने केले. शाळेत असताना धनू नाटकातून काम करायचा. शाळेच्या मासिकातुन लिखाण करायचा. सर्व शिक्षकांचा तो लाडका असल्याने सर्व जण त्याला खूप प्रोत्साहन द्यायचे. तो नकला देखील खूप छान करायचा. क्रिकेटची कॉमेंट्री सांगायचा. हे त्याचे बालपणीचे गुण आता तो सुंदर सूत्रसंचालन करतो आहे. तो मोठा साहित्यिक झाला आहे. पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यापीठात पहिला नंबर मिळवला आहे.

हे सर्व आई बाबांच्या च्या प्रोत्साहनाचा परिणाम आहे. आम्ही मोठे झाल्यानंतर आमच्या मैत्रिणी कोण मित्र कोण यावर आईचं बारीक लक्ष असायचे. आम्हाला कधीही कुणाला संस्कार वर्गाला पाठवलं नाही. आईने आम्हाला स्वतः कागदी वस्तू करायचे शिकवले. मस्त सुबकपणा त्यात असायचा. पंचपाळे, वेगळ्या प्रकारच्या होड्या, फोटो फ्रेम, कागदाचा फटाका आम्हाला करायला शिकवले. आईला भरतकाम विणकामाचा फार नाद. अगदी पुड्या चा दोरा त्या वेळी ती जमा करायची. त्याकाळात सामान कागदात मिळायचे आणि त्याला दोरा गुंडाळलेला असायचा. आई या दोऱ्याचे मोठे बंडल करून ठेवायची . क्रोशाच्या सुईने पिशव्या , ताटावर झाकायचे रुमाल ,तोरण बनवायची. पांढऱ्या दोऱ्यात रंगीत दोरे मधेमधे वापरून मशीन नसतानाही सुंदर सुंदर शिवण काम करायची.शर्टच्या बटनांचा एक मोठा ससा तिने बनवला होता. तिच्यासाठी दिवसाचे तास जास्त होते की काय माहित नाही पण प्रचंड कामाचा आवाका होता आणि या कामात ती कायम व्यग्र असायची. आवड असली की सवड मिळते. स्वयंपाकात तर ती अक्षरशा अन्नपूर्णा होती .

आमचे नागेश आणि सुनीता हे चुलत भावंड आईला प्रेमळ काकू म्हणायचे. कारण तिचे सासरचे नाव प्रमिला होते. तिच्या मधले हे गुण संगीतामध्ये देखील आलेले दिसतात. त्यान तिला सुद्धा खूप कलाकुसरीची नाजूक काम करायची आवड आहे आणि तिला तिचा साथीदार संजयराव यात खूप मदत करतात. संजय राव हे स्वतः खूप चांगले कलावंत आहेत. त्यांच्या रांगोळी चित्रांनी बँकेच्या या सर्व कार्यक्रमात रंगत आणली. दोघे मिळून खूप छान छान टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू बनवत असतात. संजूने लहानपणी एक वही बनवून त्यात छान छान चित्रे चिटकवून कथा लिहिल्या होत्या. त्यात एका रिक्षावाल्याची कथा खूपच सुंदर लिहिली होती. फारच हुशार होता आमचा संजू. सगळ्यांच्या

कलागुणांना वाव देणारी आमची आई आणि बाबा यांना आमचा शतशः प्रणाम



## १७. अधिकाचा महिना

दर तीन वर्षांनी एकदा येणारा अधिकाचा महिना म्हणजेच धोंड्याचा महिना आमच्या लहानपणापासून मला खूप आवडतो. कारण या महिन्यात अनारसे करून ब्राह्मणाला आणि ज्यांचे  जावई असतील त्यांना देत असतात. आमच्या वाड्यात आमच्या सर्व काकांच्या जावयांना आईने आग्रहाने घरी बोलावून अधिक महिन्याचे वाण दिले होते. अजूनही काकूजी या महिन्यात मस्त भरपूर अनारसे चे पीठ तयार करून ठेवतात आणि कुणी  आले की त्याला गरम गरम अनारसे करून घालतात. भास्कर मामाला अनारसे खूप आवडायाचे. आई माणसांनाच काय पण गाईला देखील गूळ आणि कनकीचे धोंडे उकडून खाऊ घालायची. कधी कंटाळा केला नाही. आता आपल्या सर्वांकडे मिक्सर आले आहेत. पण आईने लोखंडी खलबत्त्यात तांदूळ कुटून तसेच जात्यावर साखर दळून अनारसे बनवलेले आहेत. आम्ही नगरला होतो त्यावेळी आईच्या कानात एक किडा (त्याला म्हशी किडा असे म्हणायचे )  रात्री गेला. पाणी टाकले पण तो आत आत  गेला. खूप वेदना सुरू झाल्या. प्रचंड डोकेदुखी सुरु झाली. तो किडा आत मेला. त्याचा संसर्ग झाला.  पण त्याही परिस्थितीत कानात किडा ठेवून आईने मसाला केला , सत्यनारायण केला, अधिक महिन्याला ब्राह्मणाला पुरण पोळी केली. पंधरा-वीस लोकांना जेवायला बोलावले. घरी सगळं काम केलं. आईच्या डोक्यात तीव्र वेदना होत असायच्या. मग आईला नगरच्या दवाखान्यात नेले. डॉक्टरांनी छोट्या ऑपरेशन करून तो मेलेला किडा काढून दाखवला.  त्या कडे पाहून म्हणाली “या छोट्याशा किड्या कडे लक्ष देऊन बसले असते तर धोंड्याचा महिना निघून गेला असता!  पुरुषोत्तम मास गेला असता! मनाला रुखरुख लागली असती! “ ग्रेट!!! स्वतःच्या तब्येतीची पेक्षा इतरांना खाऊ घालने त्यांचा मानपान करणे यातच तिला खूप आनंद असायचा. त्यासाठी ती स्वतःचे दुःख , वेदना कायम विसरायची. सहनशीलता तिच्याकडे ओतप्रोत भरलेली होती. मी खूप भाग्यवान मला आई-बाबांकडून खूप वर्ष अधिका चे वाण मिळाले. औरंगाबादला अंजु कडे

असताना सगळ्या नातेवाईकांना धोंड्याच्या जेवणासाठी बोलवायचे. सर्व भाच्या पुतण्या मुलींना जावयांना  ती यांना धोंड्याचे वाण द्यायची.  जावयाला मग अनारसे, बत्तासे, कधी म्हैसूरपाक , चांदीचा दिवा आणि स्वतः बनवलेल्या फुलवाती अगदी तुपात भिजवून देणार!  आणि म्हणायची “ घ्या तुमच्या देवाला लावा. अजूनही आम्हाला वाती , फुलवाती, सुंदर वस्त्र माळ कधीही बनवावे लागत नाहीत. आई कायम प्रत्येकाच्या घरी गेलं की या गोष्टी आवर्जून करते. तिच्या कुठल्याही वस्तू बनवताना त्या इतक्या सुंदर,सुबक  होतात की पहात रहावे वाटते.

एवढेच काय माझ्या विहीणबाई वृंदाताई यांना ही आईने धोंड्याचे वाण दिले! म्हणाली “वृंदा  तुम्ही देखील माझ्या मुलगीच आहात!”  एवढी मनाची विशालता आणखी कुणाकडे असते? वाड्यातल्या काका-काकू , माझ्या बहिण भाऊ त्यांचे जावई यांना जेवायला बोलणारच. धोंड्याच्या जेवणासाठी कधी कामाचा कंटाळा नाही. अत्यंत काटकसरीने व शिस्तीने संसार केला. आता मागच्या वर्षी  नेहा चा पहिला धोंडा होता. आम्ही कलकत्त्याला होतो. तेथून बरीच तयारी केली होती. मला आईने कितीतरी वस्तू कशा बनवायच्या याची यादीच करून दिली. आज आम्ही लहानपणापासून आईचा कामाचा उरक , उत्साह,  माणसांमध्ये देव पाहणे, त्याना मदत करणे या गोष्टी कडे पाहत आहोत. त्याच मार्गावर चालायचा प्रयत्न आम्ही करत आहोत. मुलांकडे जा की मुलींकडे जा स्वयपाक घर हा आईचा आवडीचा विषय. प्रत्येकाच्या आवडीचे काय द्यायचं हे तिचं ब्रीद वाक्य ठरलेल असते. धनूला टोमॅटोची आमटी आवडते, आळूची भाजी आवडते ! संगीताला शेंगोळे आवडतात! सृष्टीला खारोड्या आवडतात. पूजा गुडदाणी आवडते! भक्तीला चिक  आवडतो. अमितला हिरव्या टोमॅटोची चटणी आवडते. नेहाला धपाटे आवडतात. वृषाली मधुराला  लोणचे आवडते. अशी प्रत्येकाची आवड आहे हे लक्षात ठेवून आजही ती आवड पुरवण्याचा ती आटोकाट प्रयत्न करते. मला पुरणाची पोळी खूप आवडते तर नेहमी करणार. “अगं खा गरम-

गरम" असं म्हणत आणखी एक तव्यावरची पुरणपोळी ताटात वाढते.  एकदा तर मालती मावशीला घेऊन ये असं मला सांगितले. मालती आणि मी एकाच शाळेत होतो. मी सकाळी शाळेत गेले आणि मालती मावशीला घरी घेऊन आले आणि आल्याबरोबर आई ने आमच्या पानात पुरणाची पोळी वाढली. आम्हाला आश्चर्य वाटले आईने कधी हा बेत ठरवला?  मालतीला देखील खूप आनंद झाला. मी आईला विचारले तू कधी ठरवलं आई?  म्हणाली "तू शाळेत गेले की मी ठरवलं. संजय रावला, पद्माकरराव  गरमा गरम पोळी  करून दिली आणि आणि आणि तुमची वाट पाहत बसले. तुम्ही शाळेतून यायची वेळ झाली की लगेच गरम पोळी तयार करून ठेवली." गरम पुरणपोळी, कुरडाया कटाची आमटी हे सरप्राईज कधीच विसरू शकणार नाही. मी म्हटलं " आई तुला या सगळ्या गोष्टी सापडल्या कुठे?"  आई म्हणाली "अगं, शोधलं की सापडतात  सगळ्या गोष्टी!" धनु चा मित्र अनिल त्याला अजून आठवण काढतो की काकुजीनी  मला आवडते म्हणून मुद्दाम कारल्याची भाजी केली होती. धनु पुण्याला गेला तरी त्याचे मित्र कायम घरी आईला भेटायला येत असतात. एकदा आईने त्याला असेच जेवायला बोलवले आणि त्याच्या आवडीची कारल्याची भाजी त्याला खाऊ घातली. संजूचा मित्र डॉ कुर्डूकर एकदा रात्री लातूर हून  अकरा वाजता घरी आला. पुरण घरात होतेच. आईने रात्री बारा वाजता त्याला गरमा गरम पुरणपोळी खाऊ घातली. संगीता ची मैत्रीण सोनी गरोदर होती. त्या वेळी ती म्हणाली काकू तुमच्या हातचे कांद्याचे थालीपीठ मला खूप आवडते. आईने लगेच कांदे चिरायला घेतले आणि गरमागरम थालीपीठ तिला खाऊन घातले.  एका वर्षी अमितचा वाढदिवस आला त्यामुळे माझं नेमकं बी एड  चालू होतं. मी कॉलेजला गेल्यानंतर आई ने दुपारी चिवडा केला, बेसनाच्या वड्या केल्या. संध्याकाळी वाड्यातल्या सगळ्या लहान मुलांना वाढदिवसासाठी बोलावून वाढदिवस साजरा केला. कंटाळा हा शब्द आईच्या शब्दकोशातच नाही. अंजलीच्या माहेरचे बोर्डे मंडळींना देखील आईने खूप नवनवीन पदार्थ प्रेमाने खाऊ घातले. ते सुद्धा काकूजीना खूप मानतात.

अंजू ची बहिण सूची, मुन्नी यांना तर आई आपल्या सख्ख्या मुलीसारखं प्रेम दिलं. धोंड्याचा महिना आणि काकूजी असे फार जिव्हाळ्याचे नाते आहे. ते अधिक महिन्याचे आमच्याबरोबर एकमेकांना आदर करा आणि सर्वांना मदत करा अशी शिकवण माझी माऊली आम्हास देत असते.



**आईच्या तीन सूना...**


## १८. क्रांतीचौकातले परभणीचे दिवस!

बाबांची बदली त्यावेळी परभणीला होती. आई-बाबा क्रांती चौकात लोहगावकर यांच्या वाड्यात राहायची. बाबांचे ऑफिस स्टेशन रोड ला होते. आमचे आजोबा साहेब आमच्याकडेच राहायचे तर कधी मांडाखळी ला पण जायचे. ते पण बाबांसारखे शांत स्वभावाचे. सतीश चे नाव त्यांनी साईबाबा ठेवले होते. आईला त्यावेळी धनु च्या वेळेस दिवस गेले होते. घर माडी वर. पाणी खालून भरावे लागायचे. मी आणि सतीश लहान होतो. तेव्हा बाबा आणि आजोबांनी कामे वाटून घेवून आईला मदत केली.आईला डोहाळे खूप कडक . पाणी पण पचायचे नाही. बाळंतपणाची दिवस... जून महिना... भर पावसाचे दिवस आणि तेव्हाच आईची आई म्हणजे आमची आजी यांचे पोटाचे ऑपरेशन झाले. आजी नांदेडला असते. मग काय आईला सोबत म्हणून तात्या बाळंतपण करायला आले व सुमन मावशीला आमच्याकडे ठेवले. मावशीची वय काही फार मोठे नव्हते. पण तरी ठेवतात. ती आईला मदत करते. धनुचा जन्म होतो खूप आनंद होतो. बाबांना त्याचवेळी प्रमोशन मिळाल्यामुळे सुमन मावशी बाळाचे नाव धनंजय असे ठेवते! खालची वरची धार पावसाची. अशावेळी बाबा आणि सुमन मावशी डिंक खलबत्त्यात कुटून त्यात खारीक खोबरे सर्व कुटून आईसाठी डिंकाचे लाडू करतात. प्रेम असले की सगळं कसं छान वाटतं. मावशीने आईला बाळंतपणात शिरा खीर खायला करून द्यायची . आई तिला मार्गदर्शन करायची. दोन महिन्यातच आई कामाला लागते. आमच्या सासूबाई म्हणायच्या “ लेकराची माय, तिला पाखराचे पाय!” खरंच आईला आराम तो कुठला? सगळे काम करू लागली. लवकरच काका , आत्या , सगळे मामा, मोठ्या मामी पाहायला आले. दोन दोन दिवस राहिले. मग नांदेड हून आजी आजोबा आले. आजीला खूप वाईट वाटेल “काय गं कुसुम, तुझे काही पण नाही करू शकले मी” म्हणाली. आई म्हणाली ” जाऊ दे आपली सुमन होती ना तिने केलं सगळं!” असे माय लेकीचा संवाद झाले. आईने आजीला ठेवून घेतले व तिला ऑपरेशन झाले म्हणून

विश्रांती दिली. स्वतः बाळंतीण असूनही तिने आईचे सर्व काही केले. धन्य ती आई. याच  घरात आई सांगते , मी लहान असताना अगदी सहा महिन्याची होते त्यावेळी मला मुडदूस काय असा आजार झाला होता हात पाय बारीक झाले. अंगावर सुरकुत्या. पोट फुगलेले. खूप काळजी वाटू लागली. आईने तर जेवण सोडले. रात्रंदिवस हाताचा पाळणा करून मला सांभाळले.  अंथरुणात तर मी दिसायचे पण नाही इतकी बारीक झाली असं आई म्हणते. रात्री उठून उठून श्वास चालु आहे की हे पहायची सर्व उपचार झाले पण हार मानली नाही. त्यावेळी शेजारच्या  पोटेकर वहिनी म्हणजे कृष्णा वहिनीने आईला कुठेतरी मुस्लीम वैद्य होते त्यांच्याकडे नेले. त्यांनी औषध दिले काहीतरी. आणि मला बरे वाटले!

लग्नानंतर आई परभणीला आमच्या वाड्यात आता  शंकर काकांचे जिथे घर होते त्या माडीवर राहायची. त्यावेळी वाड्यात मोठे आजी बाबा म्हणजे बाबांचे काका माणिकराव मांडाखळी कर देखील होते.  आईचे ते चुलत सासरे. त्यांचे पण खूप कडक सोवळे-ओवळे असायचे. आई नऊवारी साडी घालून सर्व स्वयंपाक करून नैवेद्य करून त्यांना जेवायला द्यायची. गरमागरम जेवायला देणे आईची खासियत होती. आमच्या घरी काम करणाऱ्या मोलकरणीला देखील आईने कधीही शिळे अन्न दिले नाही. आपल्या घासातला घास काढून द्यायची याची नेहमीची इच्छा असायची. परभणीला आमच्या घरी राजू बाई नावाची एक तेलगूबाई भांडी घासायची. आई तिला गरम-गरम पुरणपोळी, थालीपीठ खायला द्यायची. तिच्या मुलाला बाबा रोज केळी खायला द्यायचे. औरंगाबादला संजूच्या घराखाली मुकाबाई होती. तिचं नाव वेगळं होतं. पण तिला बोलता येत नाही म्हणून आम्ही तिला सगळे मुका बाई मुका बाई असं म्हणायचो. या मुका बाई देखील आई गरम गरम खाऊ घालायची.अगदी अलीकडे २०१४ साली आई दिवाळी ला पुण्याला धनुकडे  होती.तिथे तिने दिवाळीच्या दिवशी त्यांच्या


बिल्डींगचे वॉचमन काका आणि काकू यांनी जेवायला बोलावले. आणि काकांना धोतर व काकूला साडी दिली. ते काका काकू आईची नेहमी चौकशी करत.
परभणीला शंकर काका काही दिवस मेस मध्ये जेवायला जायचे . बाबू मुंबईला असल्याने आणि त्यांना इथे परभणीला राहावे लागत असल्याने ते मेस मध्ये जेवायला जायचे. आई कुठलाही नवीन पदार्थ झाला की पटकन त्यांना नेऊन द्यायला सांगायची. ते देखील नेहमी आईकडे येऊन छोटी डबी द्यायचे आई त्यामध्ये कोशींबीर ,चटणी, लोणचं असं काही तरी द्यायची. काका म्हणायचे या तुझ्या लोणच्याने माझ्या मेस मधील जेवणाला चव येते.



## १९. आईच्या मैत्रिणी

आईला खूप मैत्रिणी आहे. जिथे जाईल तिथल्या  मैत्रिणी आणि हो वयाचे बंधन नाही बर का. आईच्या मैत्रिणी मध्ये संगीताच्या शेजारी आहेत माझ्या शेजारी आहेत.  तिच्या सुना , नात सुना आणि त्यांच्या मैत्रिणी देखीलआहेत. या सर्व मैत्रिणीची  सोबत अगदी प्रेमाने मायेने चौकशी करणार,  त्यांना  पदार्थ करणार खाऊ घालणार! अजूनही नवीन नवीन पदार्थ शिकायला ती कायम तयार असते. पण पुष्पा मावशी आणि सरोज  मावशी यांची मैत्री काही वेगळीच आहे. अगदी साठ-सत्तर वर्षापासूनची आहे. सरोज मावशी आणि आई तर एकाच वर्गात शिकायच्या . सरोज मावशीचे घर म्हणजे आईसाठी  माहेरच होते! परभणीला बालाजी मंदिरासमोर मावशी रहायची . आम्ही नेहमी तिच्या कडे जायचो. चौकात गेलो की खरेदीसाठी की आई म्हणायची चला मावशीकडे जाऊत आणि तिच्याकडे गेलो की चहा नाश्ता तर नक्कीच व्हायचा. बऱ्याचदा तिच्याकडून जेवूनच  बाहेर पडायचो. सरोज मावशीचे मिस्टर खूप लवकर गेले त्यामुळे ती तिच्या माहेरीच राहत होती. माझी मैत्रीण निर्मला धर्माधिकारी देखील तिच्या जवळ रहायची . मग काय माझी मैत्रीण आईची मैत्रीण एकाच ठिकाणी ! मस्त पैकी वेळ कसा जायचा. सरोज मावशी  पण मी सांगते, शाळेत असताना आमच्या आईचे  अक्षर फार छान मोत्यासारखे होते. “आमच्या शिक्षिका  बाई , तुझ्या आईची वही कायम वरती ठेवायचे आणि सर्वांना दाखवायचा”. अजूनही आई परभणीला आली की या दोघी भेटणार म्हणजे भेटणारच आणि बालपणात रमून जाणे फार छान वाटते. आम्हाला या दोघीची भेट पाहून , त्यांच्या गप्पा ऐकून  खूप मजा येते. आई ची दुसरी जिवश्च कंठश्च मैत्रिणी म्हणजे पुष्पा मावशी!  ही पुष्पा जोशी आई पेक्षा बरीच लहान आहे. पण मैत्रीला कुठलेही बंधन नसते. त्यांची मैत्री एवढी घट्ट आहे की , दर वेळेला परभणी ला आल्यानंतर पुष्पा मावशी ला भेटण्याची घाई ! पुष्पा मावशी चे घर आमच्या घराच्या खूप जवळ आहे. पुष्पा मावशी आमच्या घरातील सर्व कार्यक्रमाला

आवर्जून उपस्थित असते. ती आली की आईच्या गळ्यात पडते. “ मला तुझ्याशी खूप बोलावं वाटतं, सांगावं वाटतं!” असं तिचं म्हणणं. पुष्पा मावशी ला मुलगा नसल्यामुळे आई राखी पौर्णिमेला, भाऊबीजेला धनु आणि सतीश ला तिच्याकडे पाठवायची. व तिच्या मुली त्यांना राखी बांधायच्या. माझे कॉलेज (शिवाजी कॉलेज) मावशीच्या घराच्या जवळ होते. त्यामुळे मी आणि अलका तिच्या छोट्याशा घरात जायचो. छोट्या घरांमध्ये सुद्धा इतके प्रसन्न वाटायचं. आम्हाला तिची माया , तिचा आग्रह अजूनही आमच्या लक्षात आहे. शार्वी च्या बारशाचा कार्यक्रम असो , यांचे एकसष्टी चा कार्यक्रम असो किंवा आईला फुल वाहण्याचा असो. कार्यक्रमास पुष्पा मावशी आवर्जून येते.  परवा धनुने तर कमालच केली!  फ्रेंडशिप च्या दिवशी त्याने एक छोटा लेख लिहिला, यांच्या मैत्री वरचा आणि मला म्हणाला तुझ्या  आवाजात  रेकॉर्ड करुन या दोघींना पाठवून दे. मी माझ्या आवाजात पूर्ण रेकॉर्ड केले आणि त्या दोघींना पाठवून दिले. आणि मग या दोघींनी पण आईला फोन केला आणि त्या तिघींच्या डोळ्यातून पाणी अखंड वाहत होते. खरोखरच ही मैत्री शाश्वत मैत्री आहे असं मला वाटतं. धनु म्हणतो हे व्हाट्सअप ,फेसबुक ज्या काळात नव्हतं त्या काळात जी मैत्री होती ती खरी मैत्री ! आईची सरोज मावशी आणि पुष्पा मावशी सोबत ची मैत्री पाहून मला नेहमी या गोष्टीची आठवण होते. पुष्पा मावशी आली की आईच्या हातात हात घेऊन बसून राहते. काहीच बोलत नाही. तिचा मूक संवादच खुप काही सांगुन जातो. औरंगाबादच्या जयपूरकर काकू असोत किंवा चव्हाण काकू असो माझी मैत्रीण छाया असो, संगीताच्या शेजारी वैशाली असो आमची आई असो सगळ्यांसोबत गप्पा मारते . त्यांच्यात आई मस्त रमते.




## २०. अम्मा गारू

अम्मा पारवेकर या बाबांच्या आत्या जीजी यांची सून! पण आईचे आणि अम्माचे फार जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. त्या बालाजीच्या मोठ्या भक्त. रोज सकाळी बालाजी मंदिरात जायच्या. आरती करून तीर्थ घेऊन आमच्या घरी यायच्या. एका स्टीलच्या फुलपात्रात तुळशी ची पाने आणि तीर्थ असे. तीर्थ सगळ्यांना न चुकता दररोज देणार आहे. आई त्यांना त्यावेळी चहा-कॉफी कधी उपवास असेल तर पापड तळून देणार. अम्माचा फार जीव होता आमच्या आणि आमच्या कुटुंबावर. त्यांना सोडून आमचा कुठलाच कार्यक्रम झाला नाही. आई त्यांना अम्मा गारू म्हणायची. तेलगु मध्ये अम्मा गारू म्हणजे प्रिय आई! आम्ही पण त्यांना अम्मा गारू म्हणायचो. मग वाड्यात त्या सर्वांच्या अम्मा गारू झाल्या. आमच्या पाचही भावडांच्या लग्नात केळवण त्यांनी केले.




त्यावेळी त्या  व त्यांचा मुलगा अनिल दोघेच राहायचे. दिवाळीला भाऊबीजेला पण अनिल आवर्जून यायचा.  दर रविवारी पहाटे पाच वाजता बालाजी मंदिराचे बाबाजी आणखी बरेच भक्तगण प्रभातफेरी काढायचे. 'हे नाथ नारायण वासुदेवा' असं भजन गात ते नानलपेठ च्या रस्त्यावरून जायचे. आजही सकाळी पाच साडेपाचला कधी जाग आली तर ते स्वर आमच्या कानावर पडतात. थंडी पाऊस कशाचीही पर्वा न करता अम्मा  कायम बालाजीच्या भक्त मंडळीत  असायच्या. बालाजी  मंदिरात गेल्या नाही असा एकही दिवस अम्म ला चालायचा नाही. आई तर सांगायची अम्मांचे जेव्हा लग्न झाले होते त्यावेळी त्या घरात रोज स्वतः सत्य नारायणाची पूजा करायच्या. खरोखरच इतकी देवभक्त स्त्री मी कधी बघितली नाही. अनिल चे लग्न ठरावे म्हणून त्या कायम व्रत करायच्या. आमच्या लग्नकार्यात अगदी घरचा मोठा माणूस म्हणून त्या असायच्या जणू आईची मोठी बहीण या नात्याने वावरायच्या. खूप जुना ऋणानुबंध होता. आई नेहमी गावाहून  येताना अम्मासाठी कधी साडी तर कधी शाल तर कधी फळं घेऊन भेटायला जायची. अम्मा म्हणायच्या "आलं माझं लेकरू आलं!" बाबांना त्या  बापूसाहेब म्हणायच्या. माझं घर परभणीला असल्यामुळे आई आली की आम्ही अम्मा गारूला आमच्या घरी घेऊन यायचो.  त्यांना पण खूप आनंद व्हायचा. घासातला घास काढून आई अम्मा साठी  काढून  ठेवायची. आम्हाला दोन्ही आज्ज्यांचा सहवास फारसा लाभला नाही पण ती उणीव अम्मा गारू नी पूर्ण केली. माच्या नानलपेठ मधील घराचे काम असताना  आम्ही दोन वर्षे अम्मा गारू च्या घरात राहत होतो.



## २१. सुषमाचे लग्न

३ मे १९८३ रोजी माझं लग्न झाले! त्यावेळी घरी सगळी तयारी केली. लग्नाच्या वेळी आमच्या घरी मिक्सर देखील नव्हता. पण आईने सर्व मसाले खलबत्त्यात कुटून बनवले. या माऊलीने घरीच मिरच्या निवडल्या. त्यावेळी विमलाबाई यांना लग्नाच्या मदतीसाठी बोलावले होते. संजुची मुंज पण होती. लग्नाच्या एक दिवस आधी विमलाबाई मस्त गाणे म्हणत म्हणत साखर जात्यावर दळायच्या. संजू म्हणायचा विमलाबाई माझे नाव गाण्यात घालत जा. त्यांनी सगळी कोठे घरी बनवली होती. सतीश ने देगलूर हून लाल मिरच्या आणल्या होत्या. आईने तर सिमेंटचे पोते भरून अक्षदा घरीच केल्या. शुभांगी एक महिना आधी तयारीसाठी आली होती. मस्त कुट्टा सुपारी खात खात आमचे काम चालू होते . माझे लग्न परभणी ला नूतन शाळेत झाले. त्यावेळी परभणीत कार्यालय नव्हतीच. बुद्रुककरांचे आणि आमचे असे तब्बल एक हजार लोक लग्नाला होते. बोलाचाली ला सुद्धा आपल्याकडून पंचवीस माणसं गेली होती. सगळे काका-मामा, आत्याचे मिस्टर, जावई सगळेजण येतात. आणि त्याच दिवशी यांची पुतणी नंदा हिचा दाखवण्याचा कार्यक्रम असतो. म्हणजे आपला एवढा मोठा कार्यक्रम बुद्रुक करांकडे कडे जावे लागणार आणि थोड्यावेळात आपल्या घरी नंदाचा दाखवण्याचा कार्यक्रम ठेवतात. बाबांचे एवढे मोठे मन ! मोठ्या बद्दलचा आदर भावना लक्षात ठेवून दोन्ही कडे कार्यक्रम यशस्वी होतात . माझे लग्न झाल्यानंतर पाठवणी केल्यानंतर सगळेजण घरी आले. घरी आल्यावर पाहतो तर काय आपला पाण्याचा हौद रिकामा झाला होता. आईने काय करावे? दिवसभर लग्नाचा थकवा विसरून आई चक्क हातात दोन बादल्या घेऊन धनु, संजू , सतीश यांना घेऊन कहाळेकराच्या हापशावर गेली आणि तिथून तिने पाणी आणले. कारण घरात पाहुणे आले होते आणि घरात पाणी नाही हे घरातील मुख्य स्त्रीला खूप वाईट वाटणारी अशी घटना होती. यावेळी आमच्या शेतात काम करणार माऊली आणि त्यांची पत्नी कौसाबाई यांची खूप


मदत झाली. आईला तर इतके कष्ट झाले की आईचा लग्नानंतर आवाज बसला. तिला कित्येक दिवस नीट बोलता येत नव्हते आणि सतीश ला देखील कावीळ झाली होती. तब्येत खूपच खराब झाली होती. बहिणीचे लग्न असताना तो पथ्य म्हणून आत्या कडे जाऊन दूध भाकरी खाऊन आला होता. सर्व मित्रांनी घरचे लग्न असल्याप्रमाणे कामे केली धनुचे मित्र हरी , सुहास , अनिल ! सतीश चे मित्र बंडू, हेमंत ,अनिल कौसडीकर यांनी अक्षरश: पडेल ती कामे करून माझे लग्न यशस्वी करून दाखवले. आणि हो गावातल्या गावात एसटीची सुविधा देखील बुद्रुककराना दिली. परभणी शहराच्या इतिहासात असं पहिल्यांदाच घडत होतं. शिवाजीनगर ते नूतन शाळा अशी बस पाहुण्यांसाठी सज्ज ठेवली होती. सगळ्यांना एका धाग्याने एकत्र बांधण्याचे काम आई-बाबांनी केले म्हणूनच घरातील पहिले लग्न यशस्वी झाले.. सगळ्यांना एका दोऱ्याने एकत्र बांधण्याचे काम आमच्या आईने केले म्हणूनच हा सुंदर हार तयार झाला त्याचा सुगंध सतत दरवळत राहणार. थोर माझे आई बाबा. यानंतरची सर्व विवाह सोहळे मात्र कार्यालयात झाली पण हे शाही लग्न मात्र कधीच कोणी विसरणार नाही. कायम स्मरणात राहिलेले आमचे हे लग्न गाजले . आईचा एक मूल मंत्र आम्ही लहानपणी पाठ केला आहे तो असा “प्रेम द्यावे प्रेम घ्यावे सगळ्यांनाच आपलेसे करावे आपलेसे करावे.”



## २२. मांडाखळी ची संक्रांत

माझं लग्न झालं त्याच वर्षी आमच्या सर्व काकू म्हणजे लक्ष्मी काकू, गीता काकू, रुक्मिणी काकू ,कमल काकू या सगळ्यांनी मिळून संक्रांतीला 'कुंभाराचा आवा' मांडाखळी ला लुटायचा असे ठरवले. या मध्ये मग लेकी सुनांना पण बोलवावे असे ठरले. मग विनया वहिनी, वीणा वहिनी तसेच आशा ताई , कुसुमताई,सुनीता या सुद्धा आल्या . मी सुद्धा सेलू खास या संक्रांतीसाठी आले . मांडाखळी ला कुंभारवाड्यात आवा लावायला सांगतात. गावातच नारायण काका व रमाकाकू असतात. त्यांच्याकडे पुरणा वरणाचा स्वयंपाक केला होता. सगळ्यांनी तिळगुळाचे लाडू , हळदी कुंकवाचे सामान नव्या जरीच्या साड्या घेऊन आदल्यादिवशी मांडाखळी ला पोहोचले. आईने तीळगुळाच्या सुंदर खुटखुटीत वड्या करून घेतल्या होत्या. तेथे गेल्यावर विड्याची पाने सुपारी घालून प्रत्येकी चे भोगळे बनवले एक दोघीनी विड्याच्या पानांच्या टोपल्यात आणल्या होत्या. मग दुसरे दिवशी वाजत गाजत बँड लावून कुंभारवाड्यात पोचले. सगळे गाव हा सोहळा पाहायला आला होतां. आणि गावातील बायकांचे लोंढेच्या लोंढे तिथे पोहोचले. कुंभाराच्या आवे ची पूजा केली. कुंभार काका आले. त्यांना आणि त्याच्या बायकोला मस्त आहेर आणला होता. मग सर्वांचे संक्रांतीचे हळदी कुंकू झाले आहे. त्यानंतर आवा लुटण्याचा कार्यक्रम झाला. मग बायकांची एकच झुंबड उडाली. ज्याला जे पाहिजे ते घेऊन जाण्याची परवानगी होती. त्यामुळे कोणी गाडगे कोणी मडके कोणी माठ कोणी सुरई ... जे हाताला येईल ते उचलून घ्यायची गंमत सुरू झाली. त्यावेळी लक्ष्मी काकू आम्हाला म्हणाल्या हीच खरी कुंभाराच्या आवा लुटण्याची गमंत आहे. किती उत्साहाने बायका भाग घेत होत्या यामध्ये ! आमच्या रुक्मिणी काकू त्यांच्या खास शैलीत म्हणाल्या " अगं आपल्या राजूरकरीन, उमरी करीन, बामणगाव करीन, आखाड्करीन यांच्यासाठी काही घ्या नाहीतर त्या भांडायाच्या बरं का आपल्या सोबत!" सगळे जण खूप हसले. नारायण काकाच्या घरी येऊन गरमागरम

पुरणपोळीचे जेवण करून थोडा आराम करून आम्ही परभणी ला परत आलो. खूप मजा आली. माझी पहिली संक्रांत मांडाखळी ला झाली. नंतर आईने मला काळी साडी घेतली. बायकांसाठी हळदीकुंकू झाले.  हलव्याचे दागिने घेऊन आम्ही काही फोटो काढले. खूप हौस झाली.  अजूनही आता आम्ही भावजया , वहिनी या ज्येष्ठा सोबत परत एकदा मांडाखळी ला अशी अनोखी संक्रांत पुन्हा एकदा ठरवतो. पण योग येत नाही. या गोष्टीला जवळपास ४० वर्षे झालीत. पण आठवणी मात्र कालच घडून गेल्या सारख्या ताज्या आहेत. आईच्या आणि आमच्या नात्यातली बरीच माणसे आता काळाच्या पडद्याआड गेली पण आठवणी मात्र कायम उरात आहेत.



## २४. नवरात्र


नवरात्र आले रे आले की अजूनही आम्हाला खूप आनंद होतो. याचे कारण म्हणजे आमच्या काकू आणि आई चे भजनी मंडळ. नवरात्रीतील देवीच्या शक्ती जागवण्याचे ते दिवस खूप प्रसन्न वातावरण निर्माण करतात. परभणीचे अष्टभुजा देवी ,गोरक्षण जवळील तुळजा माता आशीर्वाद नगर मधील दुर्गा माता या देवीची यथासांग मंगळवारी आणि  शुक्रवारी पूजा व्हायची . आई आमच्या सगळ्या काकू , त्यांच्या मैत्रिणी जात असत. अत्यंत श्रद्धेने त्याची पूजा व्हायची . वाड्यातल्या सगळ्या जणी मिळून एक दिवस मांडाखळी ला माळावरच्या देवीला जायच्या. सातव्या  माळेला देवीची मोठी यात्रा असते. तिथे जाऊन देवीची यथासांग पूजा करून देवीला वेढा घालायचा कार्यक्रम असायचा. वेढा म्हणजे प्रदक्षिणा . अनवाणी पायाने संपूर्ण डोंगरालाच प्रदक्षिणा  घालायची. चिखलातून चालत चालत जाऊन प्रदक्षिणा पूर्ण करण्याचं काम केवळ श्रद्धेपोटी होत असे.  आम्ही लहान असल्यामुळे गाडी जवळच बसायचो. दर्शन घेऊन या सगळ्या यायच्या तेंव्हा त्यांच्या चेहऱ्यावर अजिबात थकवा नसायचा. उलट एक प्रसन्नता असायची. एक सात्विक / अध्यात्मिक तेज असायचे.  संपूर्ण वेढा पूर्ण करायला जवळजवळ अडीच ते तीन तास लागायचे. बाबा सुद्धा दरवर्षी न चुकता देवीला प्रदक्षिणा घालायचे. वयाच्या 76 व्या वर्षी देखील त्यांनी देवीची प्रदक्षिणा पूर्ण केली होती. त्या काळातलं घरातलं वातावरण खूप प्रसन्न असायचे. वाड्यात सगळ्या जणी दुपारी तीन वाजता जेवण आटोपल्यानंतर भजनाचा कार्यक्रम करायच्या. ते ऐकायला खूप छान वाटायचं. गीता काकू, लक्ष्मी काकू,कमल काकू आणि त्यांच्यासोबत आखाडकरकाकू , उमरीकर काकू देखील असायच्या. सुंदर आवाजात सगळ्या भजन म्हणायच्या. त्यानंतर पुढची पिढी देखील त्यात सामील झालिये.  आपोआपच संस्कार पुढच्या पिढीमध्ये झिरपत गेले. विनया वहिनी, वीणा वहिनी आणि  कुसुमताई,आशा ताई सिंधुताई सर्वजणी आईच्या मस्तपैकी पाच पाच किलो गहू ओटीचे सर्व सामान केळी

आणखी कुठले फळ घेऊन यायच्या . एकमेकींना थंडगार चंदनाची उटी शिंपल्याच्या साह्याने हातावर काढायच्या. छान पैकी आटवलेले दुध फराळ द्यायच्या. तांबूल पण मस्त असायचा. आई सकाळी पाच वाजता उठून अष्टभुजा देवी ला चालत जायची आणि तिथून प्रसाद घेऊन यायची. खूप खूप छान वाटायचं. थंडीच्या दिवसांमध्ये अंधुक उजेडात आईसोबत आम्हीदेखील देवीला जायचो. पहाटेचा प्रसन्न गार गार वारा आणि श्रद्धा पूर्ण वातावरण आज देखील मनाला आल्हाददायक वाटते. तिथले भजन अजूनही आठवते. **नामाचा मोगरा वाहू सारंग धरा**.... वाड्यात होणारा दुपारचा भजनांचा कार्यक्रम खूप मनोरंजनाचा असायचा. आधी भजन व्हायचे. नंतर गवळणी व्हायच्या. खूप मज्जा यायची. गोपिकांना अडवणारा कृष्ण, पेंद्या हि सगळी पात्र वठवली जायची. छोट्या मुलाला मग कधी कृष्ण बनवायचे मग आरती व्हायची. प्रसाद वाटला जायचा. रात्री वाड्यामध्ये सगळ्यांकडे नवरात्र असल्याने आरत्या म्हणण्याची चढाओढ असायची. काकू कडे आम्ही आरत्या म्हणायला जायचो. तेंव्हा पासून आम्हाला सगळ्या आरत्या पाठ आहेत. आमच्या रुक्मिणी काकू चा आवाज खूप छान होता आणि त्यांनी दिलेल्या त्यांच्या चाली वर आम्ही आजही मोठ्या अभिमानाने उच्च स्वरात आरती म्हणायचो. आमचे बाल विद्यामंदिर चे कस्तुरे सर पारवेकर यांचे जावई! त्यांच्याकडे देखील आम्ही आरती म्हणायला जायचो. कस्तुरे सर देखील मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात म्हणायचे. या सगळ्याचा परिणाम आमच्यावर खूप चांगला झाला. पाठांतर आमचं खूप चांगलं झालं. शब्दांचे अर्थ समजू लागले आणि एक भक्तीमय वातावरण मनामध्ये रूजायला लागले. त्यानंतर दसऱ्याला सगळ्यांच्याकडे सोनं द्यायला जायचो. आई आमच्याकडे खूप लहान मुले यायची म्हणून बेसनाच्या वड्या करून ठेवायची. आलेल्या प्रत्येक मुलाला वडी हातात द्यायची ! ते मूल आमच्या ओळखीचे नसले तरी आईची वडी खायला हमखास घरी यायचे!

परवा दिवाकर कडे मी गेले होते. त्याला म्हटले भजनी मंडळाची पुस्तका आहेत का? त्याने माळ्यावरच्या पुस्तकांचा गठ्ठा काढून दिला. त्या वेळी लक्ष्मी काकूंनी आपल्या हाताने लिहून ठेवलेली पुस्तके होतीदिवाकर ने  छान झेरॉक्स करून ठेवली आहेत. दिवाकर ला मी म्हटले "मला एक पुस्तक दे ना" लगेच तो म्हणाला  "घे वाच तेवढेच आपण भूतकाळात रमतो.  आपल्याला एवढ्या कुठे चांगल्या चाली देता येणार?"

यांना परभणीला बँकेत नोकरी आणि मला शाळेची नोकरी त्यामुळे मला परभणी त राहता आले आणि आई वडील यांचा खूप चांगला सहवास मिळाला. माझी बदली एकदा  प्रभावती नगर च्या शाखेत झाली. लक्ष्मी काकूच्या घरा समोरून रोज रिक्षाने जायचे. लक्ष्मी काकू मला पाहण्यासाठी मुद्दाम त्या वेळेला दारातील थांबायचे आहे हात दाखवून मला निरोप घ्यायच्या! खूप निरपेक्ष प्रेम होतं सर्वांच एकमेकावर. प्रेम, आपुलकी , माया हे शब्द परभणीच्या वास्तव्यात काठोकाठ भरलेले आहे. शाळा सुटल्यानंतर माझ्या मैत्रिणींना घेऊन मी कधीकधी शास्त्रीनगर ला कमल काकूकडे जायची . माझी  लेक आली म्हणून त्यांना केवढं कौतुक वाटायचं!  आणि जेवूनच जा म्हणून त्या सर्व मैत्रिणींना आग्रह करायच्या. संगीता परभणीला आली की आम्ही आता आमच्या घरी भजनाचा कार्यक्रम ठेवून परंपरा चालू ठेवली आहे. पूर्वी एवढी  संख्या नसते पण ते वातावरण निर्मिती करायचा मी प्रयत्न करतो. आईला खूप आवडतं मी माझ्या जाऊबाई ,मामी यांना घेऊन तसेच माझी मैत्री छाया तिला बोलावून आम्ही भजनांचा कार्यक्रम करतो.  छायाचा खूप आवाज चांगला आहे. त्यामुळे ती भजने गाते. आईची लगबग आता ही चालूच असते. स्वतः उभे राहून आटवलेले दूध तयार करते. आम्ही म्हणतो  "आई तू बस ना !" ती लगेच म्हणते " तुमचे सगळे लक्ष  खेळण्यात असतं मग दूध उतू जातं , तर कधी खालून जळतं! तेव्हा मी इथे उभं राहून दूध तयार करते!" आजही आई दुसऱ्याला आनंद कसा मिळेल याचीच काळजी करत असते.

माणसाला पुनर्जन्म असतो की नाही हे मला माहिती नाही पण असला तर मी देवाला एवढेच म्हणेन की सात जन्म मला हेच आई बाबा आणि हेच माझे सर्व नातेवाईक मिळू दे ! आई म्हणजे आपल्या आठवणींचा गाव. आई म्हणजे हक्काचं स्थान रुसणं फुगणे तिच्यासमोर सांगणारं.  बाबा म्हणजे स्वतःपेक्षा आपल्यावर जास्त प्रेम करणारे. आई आपल्यासाठी एवढे सारे करते आता वाटतं तिचं पण थोडंसं माहेर पण आपण करून बघावं. तिच्यासारखं नाही जमणार. तेवढा संयम कुठला आपल्यामध्ये?



# २५. धनुचे लग्न

आमच्या धनु आणि मीना यांचे लव मॅरेज होते. आणि मीना पण स्वप्न वहिनीच्या नात्यातलीच असल्यामुळे ओळखीची होती. वहिनीची आतेबहीण. धनु ला रजिस्टर मॅरेज करायचे होते. लग्न ठरले तारीख निघाली २ नोव्हेंबर १९९०. आम्ही त्यावेळी सेलू ला होतो. अमित बंटी दोघे ही लहान होते. लग्नाची तयारी चालू झाली. पण अमितला ऐन वेळी खूप ताप येऊ लागला. मग आता कसे करायचे? सगळे नाराज होतात. पण डॉक्टर मुदखेडकर म्हणाले “तुम्हाला अजून चार पाच दिवस आहेत. दोन दिवसांनी सांगतो.” आणि मग जायची परवानगी देतात. खूप आनंद होतो. आम्ही दोन गाड्या केल्या. कोल्हापूरला जाण्यासाठी एका गाडीत धनु, अनिल मुळजकर , मी , हे अमित आणि बंटी बसलो. बाकी सगळे जण दुसऱ्या गाडीत बसले. सोबत खाण्याची डबे घेतलेले पण ते दुसऱ्या गाडीत होते. परभणी हून सकाळी ५ वाजता निघालो. दोन्ही गाड्या पुढे मागेच असतात. गंगाखेड,परळी, अंबेजोगाई,कळंब , बार्शी पर्यंत सोबतीने व्यवस्थित चाललो होतो. पण एका ठिकाणी मात्र कसे कुणास ठाऊक गाड्या मागे पुढे होतात. त्यांच्या ड्रायव्हरने बार्शी शहरातून गाडी नेल्याने आणि तिथे ट्रफिक मध्ये अडकल्याने गाड्यांची चुकामुक होते. बापरे चार-पाच तास असेच जातात. कुणीच डबा खात नाही. आमच्याजवळ फक्त बिस्किटे फळे औषधेच असतात. आई खूप घाबरते. कधी भेट होणार? कधी भेटणार? दोन्ही गाड्या कोल्हापूरच्या दिशेने जात असतात पण कोण पुढे आहे आणि कोण मागे आहे काहीच काळात नसते. त्यावेळी कोणाकडे मोबाईल फोन नसतात त्यामुळे एकमेकांशी संपर्क साधत देखील अवघड असते. बाबा मात्र खूप खंबीर असतात आणि पंढरपूर च्या पुढे असलेल्या सांगोला गावाचे नाव सांगतात आणि तेथे आपण नक्की भेटू असे सांगतात. आणि खरोखरच त्याच गावी आमच्या दोन्ही गाड्यांची भेट होते. पाच - सात तासानंतरच्या मोठ्या तणावातून सगळ्यांची सुटका होते. भेट झाल्याने सगळ्यांनाच खूप आनंद होईल आनंदाने सर्वांचे पोट भरून जाते.

त्यामुळे डबे कोणीच खात नाही. रात्री उशिरा आम्ही कोल्हापूरला पोचतो. तिकडे मीना कडचे लोक देखील काळजीत असतात. दुसऱ्या दिवशी सकाळी बरोबर अकरा वाजता रजिस्टर मॅरेज होणार असते. लग्न व्यवस्थित पार पडते. अंबाबाईच्या दर्शना नंतर आम्ही वहिनी च्या माहेरी शिगाव ला जाऊन रात्रीचा मुक्काम करतो. दुसऱ्या दिवशी सकाळी निघून रात्री उशिरा नवरा-नवरीला घेऊन सुखरूप घरी परभणीला पोहोचतो. दुसऱ्या गाडीचा ड्रायव्हर अतिशय बेजवाबदार आणि ऊर्मट होता. येताना देखील त्यांनी दोन तीन ट्रक ला कट मारून आमचे बीपी वाढवले होते. (त्याच्या या बेजवाबदार पणाची शिक्षा लवकरच मिळाली. पुढच्या सहा महिन्यातच तो ड्रायव्हर चा एक्सीडेंट मृत्यू पावला!) या ड्रायव्हरच्या चुकीमुळे आम्ही सात-आठ तास रखडवलं होतं. हा ड्रायव्हर अतिशय रफ ड्रायव्हिंग करत होता परंतु आमच्या सर्वांचे भाग्य बलवत्तर आम्ही व्यवस्थित घरी पोहोचलो. घरी आल्यानंतर अम्मा म्हणाल्या " प्रेमल बाई तुमच्यासारखी देव माणसं गाडीत होती मग काय होणार?" "बरं देवा तुझी अशीच साथ राहू दे रे बाबा" असं म्हणून आई देवाला हात जोडते.



## २५. माझे आणि संगीताचा बाळंतपण!

आमच्या आईला जुळं झालं तिने उत्तम रीतीने त्यांना सांभाळत त्यांना मोठं केलं. अगदी खानदेश मधील धुळे येथे! पण नंतर परत एकदा जुळे असल्यासारखेच नेहा आणि कौस्तुभ यांचा जन्म झाला! पण परत एकदा घरात जुळ्यांची कहाणी. आता आईचे हे दोन नातवंडे होती. १ नोव्हेंबर १९९२ ला कौस्तुभ चा जन्म झाला. तर १२ नोव्हेंबर १९९२ ला नेहाचा जन्म झाला. संगीताचे पहिले बाळंतपण परभणीला ते तर योग्यच पण आमची मात्र झाली परत एन्ट्री दुसऱ्या बाळंतपणासाठी नेहाच्या वेळेस हा योगायोग कसा तर दोघांमध्ये फक्त अकरा दिवसांच्या अंतराचा! आम्ही परभणीला गजानन नगर मध्ये राहत होते. घर चांगलंच मोठं होतं पण माझ्या सासुबाई खूपच थकल्या होत्या. हे आईला म्हणाले " तुम्ही संगीताला घेऊन तिकडेच या . इथेच आपण दोघींचेही बाळंतपण करूया. पण आई खूप स्वाभिमानी. जावयाच्या घरी नको. त्यापेक्षा तूच इकडे ये. मी करेन दोघींचेही बाळांतपण. आणि परभणीच्या छोट्या घरात तिने अगदी मायेने , मोठ्या कष्टाने ते करून दाखवले. मी नेहा झाल्यावरच दवाखान्यातून तिकडे गेले. तोपर्यंत माझ्या घरी होते. मराठवाडा शाळेत माझी त्यावेळी नोकरी चालू होती. बाळंतपणात आईने काय करावे? तर सकाळी पाच वाजता उठायचे. आम्हा दोघींना तेल , हळद लावून स्वतःच्या हाताने कडकडीत पाण्याने अंघोळ घालायची. शेक शेगडी द्यायची. पोटाला एक साडी घट्ट बांधून द्यायची. मग गरम गरम शिरा खीर खायला देऊन झोपवायाची. मग मग आठ वाजता कौस्तुभ आणि नेहा ची मालिश करून स्वतःच्या हाताने त्यांना पायावर घेऊन चोळून चोळून आंघोळ घालायची. आणि परत अमितला पर आंघोळ घालून तयार करणे. तो त्यावेळी पहिलीला होता. त्याचा डबा ,बाबांचा नाष्टा ,आले गेले सर्व सर्व एकटी ने पहायची. वाड्यात घरी येणारे पुष्कळ असायचे. माझं सासर गावातच होतं . सगळ्यांसाठी स्वयंपाक करणार. बाळंतिणीला गरम गरम भाकरी पोळी. दरवेळेस देणार नवीन पालेभाजी! अहो यामध्ये बाबांचा पण फार मोठा सहभाग

होता. त्यांनी मांडाखळीहून  गोवऱ्याचे  पोते आणले होते. त्यावेळी देशात वातावरण खराब होते. ६ डिसेंबर १९९२ ला अयोध्येत बाबरी मशीद पाडल्यामुळे परभणीत संचारबंदी होती. यांची व आमची भेट गावातल्या गावात असून देखील आठ आठ दिवस होत नव्हती. मोबाईल पण नव्हता. त्यामुळे आईला सहाजणांना अंघोळी (म्हणजे दोन बाळे आम्ही दोघी अमित आणि तिची स्वतःची) केवढे कष्ट पडत असतील! सेलू हून स्वप्ना  वहिनी आल्या होत्या त्यांची खूप मदत झाली. सतीश कायम घरी येत असे त्याचा खूप आधार वाटायचा. दुपारच्या वेळेस आई कधी झोपायची  नाही.  जुन्या कपड्यांचे दुपटे हाताने शिवायची! शिवणक्लास झालेला होता पण मशीन नसल्यामुळे लंगोट हाताने शिवायची. दोन बाळे असल्याने खुपच दुपटे, लंगोट लागायचे. अगदी रेडीमेड सारखी शिलाई सुद्धा ओळखता येणार नाही तेवढी सुबकता  आईच्या शिवणकामात असायची . आमच्या खालच्या बैठकीत एक पलंग त्याला जोडून  एक बाज. यात एक झोका. या मधल्या छोट्या जागेत अमित व आई  झोपायचे. एक बाळ रडायचे तर दुसरे झोपायचे! आई बाबांना  झोप किती मिळणार ?  पण आई-बाबांनी कधीच कंटाळा केला नाही. कौस्तुभ थोडा जास्त रडायचा पण नेहा मात्र गाढ झोपलेली असायची. ते दोघे लहानपणापासून अगदी जन्मापासूनच म्हणून एकत्र वाढलेले म्हणजे त्यांच्यात खूप चांगली अटॅचमेंट आहे. आमचे बाळंतपण आम्हाला छान अंगी लागले. दोन्ही बाळांनी छान बाळसे धरले.  का नाही धरणार? एवढ्या प्रेमाने आजीने  दुधावरच्या साईंची काळजी घेतलेली असते. कपडे सुद्धा घरीच धुवायचे. फक्त बाळाचे व आमचे आणि भांड्यासाठी राजूबाई होती. आई बाबा ने मिळून डिंकाचे लाडू बनवले. बाबा खारीक खोबरे खिसायला मदत करायचे. अमितला बाहेर फिरवून आणायचे. डिंकाचे लाडू ,मेथीचे लाडू ,बाळंत शोपा तर आईने दोन तीन किलो करून ठेवल्या  होत्या. वर येता जाता आम्हाला “ खा गं पोरींनो अगं बाळंतपण हा दुसरा जन्म असतो बाईचा. हेच जर व्यवस्थित झाले नाही तर आयुष्यभर कंबरदुखीचा त्रास होईल करून घ्या”

तुम्हाला सांगते आम्हा दोघी बहिणींना कंबर दुखीचा त्रास कधी झाला नाही होत नाही कारण आईने एवढ्या प्रेमाने तेल हळद लावली होती ना. धन्य आमची आई तिच्या ऋणातून कधीच मुक्त होऊ शकणार नाही. त्या  वेळेस मी तीन महिन्यांनी घरी गेले सासुबाई होत्या, मामी पण होत्या, बंडूचे लग्न झाले म्हणून आमच्या घरात राहायला आल्या होत्या. अमित च्या  वेळेस मात्र अमीत सहा महिन्यांचा झाल्यानंतर सेलू ला गेले होते बंटीला पण दोन महिन्याचा  झाला तेव्हा परभणीला आणले होते. सतीश दादा ने सेलू हून  अपडाऊन केले होते. आदित्य च्या वेळेस आईने ने अंजुचे बाळपण केले. त्यावेळेस तर तिची बायपास सर्जरी झाली होती. सृष्टीला लहानपणापासून सांभाळले. पूजाला मात्र लहानपणी सात आठ महिनेच आजीचा  यांचा सहवास लाभला कारण त्यानंतर धनु पुण्याला गेला. पूजाला  लहानपणी पाळणाघरात राहावे लागेल याचे  आईला कायम दुःख वाटते. आमचे  बाळंतपण यात आई अडकली. संजू त्या वेळी अंबेजोगाईला मेडिकलला असल्यामुळे आईला पुण्याला जाता आले नाही. याची तिला खूप खंत वाटते. पण आता पूजाच्या बाळंतपणाच्या वेळेस आई धनु कडेच होती. त्यावेळी तिने या वयात पण उत्साहाने पूजा व बाळाचे खूप कौतुक केले. पूजा  तुझा नाही पण तुझ्या बाळाचा सहवास मला मिळाला याचे तिला खूप समाधान वाटते. आई आता पणजी  झाली पण तिची तब्येत पण बरी असेल तेव्हा तिचा उत्साह अगदी तरुणीला जर असाच असतो धावून धावून सगळ्यांच्या आवडीनिवडी जपण्याचं तिला धन्यता वाटते आम्हा भावंडांची आधार वाढ म्हणजे काकूंची त्यांना दीर्घायुष्य आरोग्य संपदा लाभो हीच प्रार्थना.



## २६. आईची बायपास सर्जरी

जानेवारी २००० या महिन्यात कौस्तुभची  मुंज देऊळगावराजा येथे झाली होती. त्यानंतर आईला चेस्ट पेन चा त्रास सुरू झाला. १९८८ मध्ये आईला असा त्रास झाला होता. त्या वेळी परभणीला डॉ मानवतकर यांचे उपचार घेतले होते. तेंव्हा पासून आईला बीपी चा त्रास सुरु झाला. मुंजी नंतर लगेच संजूने औरंगाबाद ला आईला बजाज हॉस्पिटल मध्ये दाखल केले. तिथे आईच्या सर्व टेस्ट झाल्या. त्या वेळीच बायपास करण्याचा निर्णय झाला. फेब्रुवारी महिन्यात पुण्याला आईची बायपास सर्जरी कार्नायचे ठरले. संजू ने  खूप प्रयत्न केले डॉक्टर जी डी कुलकर्णी  च्या मदतीने अपॉइंटमेंट मिळवली. डॉक्टर मनोज प्रधान यांनी जहांगीर हॉस्पिटलमध्ये आईची बायपास सर्जरी १२  फेब्रुवारी २००० या दिवशी केली. सर्जरी व्यवस्थित झाली. सर्जरी च्या वेळी आईला रक्त लागणार होते. धनुच्या कॉलेज मधील रक्त दाते विद्याथ्र्यांनी रांगच लावली. मोठी गर्दी केली. शेवटी हॉस्पिटल च्या रक्तपेढी प्रशासनाने बोर्ड लावून 'पुरेसे रक्त जमा झाले आहे असा बोर्ड लावून विद्यर्थ्यांना परत पाठवले! बाबांनी जहांगीर समोर एका लॉज मध्ये दोन रूम  घेतल्या होत्या. बाबा, मी ,सतीश, संजू तिथे गेलो होतो. त्या मुळे काही जणांना तिथे विश्रांती घेता येवू लागली. सर्जरी च्या दिवशी भास्कर मामा जालन्याहून आला.सर्वांच्या सदिच्छा ने आई लवकर बरी झाली. पुढचे  तीन-चार महिने आई तिथेच धनुकडे  होती.  नेहाला संगीताकडे औरंगाबादला ठेवले होते. अमित मॅट्रिकला असल्याने परभणी ला होता. आमच्या बंडू, शीला सोबत होता. बंटी देखील त्या वर्षी मॅट्रिक ला होता.  हे आंबेजोगाईला होते. फारच कसोटीचा काळ होता. फुल टेन्शन होते. तात्या आजोबांचा आशीर्वाद आणि डॉक्टरांचे प्रयत्न या मुळे ऑपरेशन यशस्वी झाले. त्यानंतर काही दिवस पुण्याला धनु कडे होती. धनु आणि मीना ने  आईची खूप चांगल्या पद्धतीने आईची सेवा केली. पूजा त्या वेळी चौथीला होती. तिची स्कॉलरशिप परीक्षा त्याच आठवड्यात होती.  संगीता देखील त्यांच्या मदतीला तिथे गेली. संगीताची भक्ती

त्या वेळी २ वर्षाची होती. बोबडे बोलून ती सर्वांचे मनोरंजन करीत असायची. काही दिवस पुण्याला राहून आई अंजू कडे आली. अंजुने देखील आईची खूप छान काळजी घेतली. काकूजीची तब्येत बरी झाली सगळीकडे आनंदी आनंद झाला. मग काय आम्ही देखील अमित ची मुंज ठरवली.

ते दिवस होते कडक उन्हाळ्याचे! रखरखीत उन्हाचे. साल २०००. परभणी चा उन्हाळा तर फारच भयंकर. अशातच मे महिन्यात आम्ही आमची मुंजे ठरवली हे मुंज होणार होती पोखरणीला. अमित ची  दहावीची परीक्षा संपली होती. पेपर छान गेले होते. मला पण शाळेला सुट्टी होती. त्यामुळे आम्ही  नरसिंह मंदिर पोखरणी येथे अमितची मुंज ठरवली. मग तयारी सुरू झाली. धामधूम सुरु झाली. मी मामीच्या आणि शीला च्या मदतीने मुहूर्त करून घेतले.

आई बाबा संगीता लवकर परभणीला आले. मस्त भिक्षावळ चे लाडू ,अनारसे, करंज्या माझ्या जाऊबाई मामी संगीता आणि काकू जी यांनी केले. छान गाणे म्हणत मस्त तयारी सुरू झाली. देव ब्राम्हण झाला. अगदी बाहेर शाही आंघोळी बॅंड सहित  झाल्या.  सर्व मस्त चालले होते आता चार दिवसांनी मुंज होती. पोखरणी मुक्कामी. दिवसभराची दगदग म्हणा किंवा अतिशय आनंद झाला म्हणाला आई च्या  छातीत रात्री पुन्हा दुखू लागले. घरी कशाला राहायचे म्हणून आम्ही आईला डॉ जवादे यांच्या दवाखान्यात रात्री साडेअकराला घेऊन गेलो. घर पाहुण्यांनी सगळे भरून गेले होते. डॉक्टरांनी आईला लगेच ऍडमिट करून घेतले. काय करणार? आई  खूप नाराज झाली. तिला  खरा उत्साह होता मुंजीचा. पण त्या वेळेला नेमकी आई दवाखान्यात अॅडमिट होती. आमच्या घरचे पहिलेच कार्य असल्यामुळे सकाळी  पाहुणे यायला सुरुवात झाली होती. पण कोणाचेच लक्ष लागत नव्हते. नुसती तडफड जीवाची होत होती. सतीश ,वहिनी , धनु ,संजू ,अंजू सगळेजण आले. संजू म्हणाला आपण आईला औरंगाबादला घेऊन जाऊ. पण आई म्हणाली मुंज होई पर्यंत  मी कुठे जाणार नाही. मग मानवतकर यांच्या दवाखान्यात आईला ऍडमिट केले. मुंजीच्या दिवशी आम्ही आधी

दवाखान्यात गेलो. संजू,धनु तिच्याजवळ थांबले. कोणी तरी डबा दिला. ते दोघे दिवसभर तिच्या जवळ बसुन राहिले. कोणाचेच लक्ष लागत नव्हते. मुंजीला बाकी सर्व जण आले होते पण मध्ये काकूजी नसल्यामुळे रिकामे रिकामे वाटत होते. पण ठरलेला कार्यक्रम थांबवता येत नव्हता. मुंज लागल्यावर आम्ही दवाखान्यात काकू गेलो. आईने अक्षदा अमितच्या डोक्यावर टाकल्या. अमितला आशीर्वाद दिले. आईने दवाखान्यात आहेर केला. मुंजी साठी सर्वात उत्साही असलेल्या आईला मुंजीला उपस्थित रहाता आले नाही. लगेच आईला घेऊन संजू-अंजू औरंगाबादला गेले. सतीश, वहिनी, धनु , संजू, संगीता माझ्यासोबत थांबले. भरपूर पाहुणे होते. दुसऱ्या दिवशी आमच्या मुंजीचा सत्यनारायण ठरलेला होता. पण रात्रीच भास्कर मामा, धनु आणि संजय राव औरंगाबादला गेले. मे महींना असल्याने ट्रेन ला प्रचंड गर्दी होती. हे तिघे अक्षरशः उभे राहून पासेंजर ट्रेन ने औरंगाबाद ला गेले. आईला चिकलठाणा येथील धूत हॉस्पिटल मध्ये ऍडमिट केले होते.

आमचे कोणाचेच लक्ष लागत नव्हते. आम्ही पण लवकरच औरंगाबादला गेलो. तिथे पुन्हा आई आठ दहा दिवस दवाखान्यात होती. पण हळूहळू आईची तब्येत सुधारू लागली. डिसचार्ज मिळाला. मग काही आई बाबा दिवस सतीश कडे राहिले. सतीश आणि वहिणीने देखील आईची खूप सेवा केली. या काळात आई खूप घाबरली होती. आंघोळ करायला जाताना देखील तिला भीती वाटू लागली. एरंडोल हून भुसनळे मामा आणि मामी आल्या. त्यांनी आईला खूप धीर दिला तेव्हापासून आईची भीती कमी झाली. आणि आई हळूहळू पुन्हा पहिल्यासारखे होऊ लागली. बाबांनी आईची खूप सेवा केली. सर्वांच्या सदिच्छा ने आई पुन्हा एकदा कार्यरत झाली. डॉक्टर सून आणि मुलगा असल्याने आई लवकर बरे होऊ शकली. अमित आणि बंटी चा दहावीचा निकाल दोघांनाही चांगले मार्क मिळाले. अमित तर मेरिट लिस्ट मध्ये आला. बाबांना खूप आनंद झाला. आम्ही मुंजीचा

सत्यनारायण दोन महिन्यानंतर केला. अशी झाली आमची मुंज आणि आईचे आजारपण!



**धनुच्या एका पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात आईचा ख्यातनाम निवेदक प्रदीप भिडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला!**



**२७. आमचे आजोबा ती. तात्या**

आमचे आजोबा तात्या म्हणजे आईचे वडील अतिशय ज्ञानी योगीपुरुष होते. त्यांनी अनेक धर्मग्रंथ यांची निर्मिती केली. ते स्वतः चांगले प्रवचनकार होते. त्यांनी करोड गिरी मध्ये म्हणजे आजचे सेल्स टॅक्स डिपार्टमेंट मध्ये नोकरी केली. प्रपंच खूप चांगला केला आणि परमार्थही. असे सगळे चांगले गुण एका ठिकाणी मिळणे दुर्लभ असते. पण आमच्या तात्या मध्ये ते गुण होते. आमची आजी १९६५ सालीच देवाघरी गेली. भास्कर मामा त्यावेळी अवघा आठ वर्षाचा होतो. दुसरीला होता. इतक्या लहान वयात त्याला मातृसुखाला पारखे व्हावे लागले. पण तो आमच्या आईलाच तो त्याची आई समजायचा. आईनेही त्याच्यावर पोटच्या मुलासारखे प्रेम केले. धन्य ती बहीण भावाची माया. तीर्थरूप आजोबांचा खूप गाढा असा धार्मिक ग्रंथांचा अभ्यास होता. ते प्रवचन देण्यासाठी खूप लांब लांब जात असत. त्यांच्या गुरूच्या परवानगी नंतर ते गुरुमंत्र देखील देऊ लागले. त्यांनी एकनाथ महाराज, भटजी बापू हैदराबाद यांच्यावर खूप लिखाण केले आहे. अतिशय रसाळ असे त्यांचे लिखाण असे. त्यांचा कर्म कांड वर अजिबात विश्वास नव्हता. बहुजन समाजातील अनेकलोक त्यांचे शिष्य

होते. त्यांचा शिष्य परिवार देखील खूप मोठा आहे. धुळे, जळगाव , एरंडोल अशा खानदेशात त्यांचे खूप शिष्य आहेत. डॉ भुसनळे यांनी तात्यांचे चरित्र लिहिले आहे. त्यातून आम्हाला तात्यांच्या अनेक गोष्टी समजल्या. तात्या त्यांच्या पायाला भिंगरी लागल्यागत फिरत असत. आणि अचानकपणे कधीतरी दत्त म्हणून दारात उभे राहायचे. आल्यानंतर सगळ्यांशी ते खूप गप्पा मारायचे. अगदी मुलात मूल होऊन खेळायचे. आम्हा सर्व नातवंडांसाठी खूप साऱ्या पंचधातूच्या अंगठ्या आणायचे. सुंदर सुंदर प्राण्यांच्या गोष्टी चे पुस्तके आणायचे. आमच्या भास्कर मामा कडे गोष्टींच्या पुस्तकांचा प्रचंड खजिनाच होता. त्याची स्वत:ची एक पुस्तकांची लायब्ररी होती. तो त्यांच्या लायब्ररीतील सगळी पुस्तके सुट्टीत आमच्या कडे घेऊन यायचा आणि आम्ही ते वाचून त्याचा फडशा पाडायचो. भास्कर मामा सुट्टीत आम्हाला खूप गोष्टी सांगायचा. या सगळ्यामुळे आम्हाला वाचायची खूप गोडी लागली. तात्यांच्या शिष्यांकडून आम्हाला त्यांचे वेगवेगळे अनुभव ऐकायला मिळाले. आपले आजोबा किती ग्रेट आहेत हे आम्हाला त्यातून कळाले. एका दैवी शक्तीचा तात्या मध्ये संचार होता.इतके फिरून आले तरी कधी कंटाळलेले थकलेले उदास दिसायचे नाही. आमच्या घरी परभणी ला आल्यानंतर ते दोन दोन चकरा ममता कॉलनी मध्ये मारायचे. सगळीकडे ते पायी फिरायचे. आज काय सुधीर भेटला नाही आज काय मामाच ऑफिसला गेला होता की लगेच पुन्हा ममता कॉलनी ला जायचे. त्यांचे शिष्य परभणीला, जालन्याला ,जळगावला, एरंडोलला सगळीकडे असायचे . त्याना भेटायला यायचे . “ माझ्या कारमधून तुम्ही प्रवास करा आता बस ने प्रवास करू नका “ म्हणायचे पण तात्या ऐकायचे नाही आणि कायम फिरत राहायचे. लोकांचे प्रबोधन करत राहायचे. प्रवचनातून चांगल्या संस्काराची देणगी द्यायचे.कधी कुणाकडून पाच पैसे घ्यायचे नाही. आमचे तात्या ११ जून १९८० रोजी वयोमानाप्रमाणे देवाघरी गेले टेंभुर्णी ला!

त्यानंतर आधी भाऊ मामाने आणि नंतर भास्कर मामाने गुरुपौर्णिमेला तात्यांच्या सर्व शिष्यांना एकत्र बोलावून उत्सव करायचे सुरू केले. तात्यांचा एवढा मोठा शिष्य परिवार आलेला सर्व जाती पंथ धर्मातले सगळे मिळून जालन्याला यायचे. भास्कर मामा सर्व खर्च करायचा. सर्वांना जेवण द्यायचे. सर्वजण मिळून तात्यांच्या आठवणी जागवायचे. तात्यांच्या पादुकांची  पाद्यपूजा करायचे. भास्कर मामाने चांदीच्या पादुका बनवून घेतल्या होत्या. तात्यांचा मोठा फोटो होता . त्या दिवशी मोठा अभिषेक करायचा . मामा दरवर्षी वेगवेगळ्या शिष्यांच्या पती-पत्नीच्या जोड्यांना अभिषेक करायला सांगायचा. स्वतः मात्र कधीच पूजेला बसला नाही. खूपच निरपेक्ष भास्कर मामा होता. तात्यां वर बनवलेली आरती जल्लोषात सर्व शिष्यगण गायचे. आमचे सर्व नातेवाईक, तात्यांची मुले, सुना, जावई ,मुली, नातवंडे आणि सुद्धा उत्साहाने गुरुपौर्णिमेला यायचे.  भास्कर मामा नंदा मामी  सर्वांचे मनापासून स्वागत करायचे.ऑगस्ट २०१७ मध्ये  भास्कर मामा गेल्यानंतर सुधीर आणि विशालने देखील ही परंपरा पुढे चालू ठेवली आहे. आई, प्रमिला मावशी ,सुमन मावशी, नीलिमा मामी,सविता, माधुरी  दोन चार दिवस आधी तयारी साठी यायच्या. मग आम्ही जायचो. एक दिवस आमचा मुक्काम जालन्याला व्हायचा. आमचे बाबा मला हायकोर्ट एक्सप्रेस ला घ्यायला यायचे संगीता बीड हून यायची तिला आणायला बाबा पुन्हा चौफुली ला जायचे!

तात्यांच्या शिष्य कमलबाई आणि विमलबाई ह्या एरंडोल तालुक्यातील असोदा गावच्या इतक्या लांबून ह्या दोघी गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमाला दरवर्षी न चुकता यायच्या  आणि म्हणायचा गुरु महाराजांच्या या कृपेमुळे आमची आयुष्य मार्गी लागले. त्या म्हणत होत्या.   “ एकेकाळी आमच्या घरात खायला नव्हते पण गुरु महाराजांच्या कृपेने तीन मजली हॉटेल झाले.”  भास्कर मामा चे मित्र नाईक पुढे विशाल चे मित्र अगदी घरचे होऊन काम करतात. खूप प्रसन्न वाटते. आजोबांचे आशीर्वाद घेतल्यामुळे मनाला सकारात्मक ऊर्जा मिळते. संजू अंजू

दवाखान्याचा एवढा मोठा व्याप असूनही संध्याकाळी प्रसाद घेण्यासाठी आवर्जून यायचे. संतोष यायचा. जालन्याला भास्कर मामा आईला ठेवून घ्यायाचा. " बाई तू घरी राहिली म्हणजे सगळं घर भरल्यासारखा वाटतं" असं म्हणायचं! नंदा मामी अगदी मनापासून प्रेमाने सर्वांचे स्वागत करायचे. इंदू मावशी, सीता काकू , जालन्याचा शाम मामा हे सर्वजण भेटायला यायचे . पण दुर्दैवाने नंतर भास्कर मामा रिटायरमेंट नंतर दोन वर्षातच देवाघरी गेला आता वाटलं गुरुपौर्णिमा कशी साजरी होणार ? पण नाही दुसऱ्याच वर्षी विशालने ठरवले गुरुपौर्णिमेच्या उत्सवात खंड पडू द्यायचा नाही . त्याच्या या निर्णयाचे आम्हाला खूप कौतुक वाटले. विशाल लहान वय त्याने आजोबांना पहिले देखील नाही पण न पाहिलेल्या आजोबांचा मोठा उत्सव तो तितक्याच उत्साहानं आजही करतो. यावर्षी करोना च्या साथीमुळे हा उत्सव होऊ शकला नाही पण प्रत्येकाने आपापल्या घरातून तात्यांना आदरांजली वाहिली. गुरुपौर्णिमेचे जुने फोटो सर्वांनी एकमेकांना शेअर केले. फोनवरच सर्वांशी गप्पा मारल्या आणि आता त्यांच्या आठवणींचा जागर केला विशाल घरच्या घरी अभिषेक करून तात्यांच्या गुरुपौर्णिमेला पूर्णत्व दिले! पुढच्या वर्षी सर्वांनी मोठ्या उत्साहाने आपण गुरुपौर्णिमा साजरी करूया असे ठरवले आहे. तात्यांचे कृपाछत्र आमच्या डोक्यावर आहे खूप आधार वाटतो. त्यांचा आम्हाला खूप अभिमान आहे . सुधीर , विशाल आणि राजेश तिघेही आजोबांच्या वारशाला जगणारे आहेत. नुकतीच सुधीर ने तात्यांची एक सुंदर वेबसाईट सुरु केली आहे. त्यात तात्यांच्या सर्व ग्रंथांची माहिती आहे, छायाचित्रे आहेत. आम्हा सगळ्या नातवंडाना आजोबांच्या कर्तृत्वाचा अभिमान आहे. आमच्या आजोबांच्या मधील एक टक्का जरी गुण आमच्यात आले तरी आम्ही आम्ही मला कृतज्ञ समजून गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः



## २८. आमचे बाबा

बाबां बद्दल काय बोलावे आणि काय लिहावे? शब्दच नाहीत... अतिशय कष्टातून त्यांनी स्वत:ला घडविले. विक्रीकर विभागात वयाच्या अठराव्या वर्षी ते क्लार्क म्हणून जॉईन झाले. पुढे त्यांनी नोकरी चालू असताना पदवी शिक्षण पूर्ण केले. विभागीय परीक्षा दिल्या. अत्यंत चिकाटीने आणि प्रामाणिकपणे शासनाची सेवा केली. डिसेंबर १९९१ मध्ये वयाच्या ५८ व्या वर्षी ते सेवा निवृत्त झाले ते सुपर क्लास वन विक्रीकार अधिकारी वर्ग - १ या पदावरून! (त्या वेळी त्यांच्याकडे असिस्टंट कमिशनर ऑफ सेल्स टॅक्स या पदाचा अतिरिक्त कार्यभार देखील होता!)

बाबांच्या वयाच्या सातव्या वर्षीच त्यांचे मातृछत्र हरपले. आत्याचे तर लग्न त्यांच्या वयाच्या सातव्या वर्षीच झाले होते. मग काका काकू आणि आमचे

आजोबा (त्याना सगळेजण तात्यासाहेब म्हणायचे!) त्यांनी बाबांना सांभाळ केलां. बाबांचा स्वभाव अतिशय शांत संयमी होता. आम्हा बहिण भावांना कधी एक चापट देखील मारल्याचे आम्हाला आठवत नाही. धुळ्याला असताना तर सतत वीस दिवस घराच्या बाहेर असायचे. अगदी दुर्गम भागात त्यांचे दौरे असायचे. फोन नाही. काही नाही. पण वीस दिवसानंतर नंतर सगळ्यांसाठी काही ना काही घेऊन यायचे. त्यांनी ऑफिसच्या कामाचा कधीच त्रागा केला नाही, चिडचिड केली केली नाही. एकदा काम स्वीकारले की ते करायचे हा त्यांचा पिंड होता. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांना डिपार्टमेंट मध्ये नोकरी लागली. नंतर त्यांनी त्यांचे ग्रॅज्युएशन पूर्ण केले आणि डिपार्टमेंटच्या परीक्षा देत ते सुपर क्लास वन ऑफिसर या पदापर्यंत पोहोचले. म्हणजे क्लर्क असिस्टंट कमिशनर ऑफ सेल टॅक्स एवढी मोठी झेप घेतली. कार्यालयीन काम करताना त्यांनी सदैव सरकारचा विचार केला. खरं तर या डिपार्टमेंट मध्ये अनेक घोटाळे गमती जमती चालतात पण बाबांनी कधीही त्या मार्गाचा अवलंब केला नाही. शासनाच्या विरुद्ध झालेल्या अनेक संपामध्ये बाबा कधीच संपात उतरले नाहीत. उलट ते कायम शासनाच्या बाजूने उभे राहत. आपले कामकाज त्यांनी या काळात चालू ठेवले. अनेकदा त्यांना पोलीस संरक्षणामध्ये कार्यालयात जावे लागले. पण शासनाची चाकरी अतिशय प्रामाणिक पणे करण्याचे त्यांचे ध्येय होते आणि त्यांनी ते कायम ठेवले. परभणी असताना एका साखर कारखान्याचे मोठी थकबाकी होती. राजकारणातील एक भलं मोठं प्रस्थ एक माजी मंत्री यांचा तो साखर कारखाना होता. असं असताना देखील बाबांनी त्यांच्या थकबाकी च्या विरुद्ध कारवाई सुरू केली. अनेक प्रकारचे दडपण बाबा वर आले. धमक्या आल्या. पण बाबांनी आपला प्रामाणिकपणा सोडला नाही. आणि झक मारत त्या राजकारण्यांना दंडा सहित थकबाकी भरावी लागली! सरकारी तिजोरीत अशा प्रकारे बाबांनी अनेकदा भर टाकली होती. ऑफिस मध्ये त्यांनी आपल्या पदाचा कधीही दुरुपयोग केला नाही. कधी हाताखालच्या लोकांना साधा मेमो देखील

दिला नाही. ते म्हणायचे " मेमो दिला कि तो कागद त्याच्या फाईलला लागतो व आयुष्यभर त्याला त्याचा त्रास होतो.त्याच्या पेंशनला प्रोब्लेम येतो. " या पेक्षा ते त्या कर्मचाऱ्याला समजावून सांगत . त्यांचे मित्र राजूरकर काका, वैद्य काका ,काटे काका आम्हाला सांगायचे की बाबांनी कधीही कुणाला रागावले नाही. अतिशय शांतपणे प्रत्येकाकडून ते काम करून घ्यायचे. अनेक लोक त्यांना याला मेमो द्या त्याला मेमो द्या असं सांगायचे पण बाबांनी कधीही कुणाला मेमो देऊन त्याचे करिअर खराब होऊ दिले नाही. अनेकदा कामाच्या व्यापात त्यांनी स्वतःकडे दुर्लक्ष केले. आईने दिलेला डबा जशाचा तसा परत आणायचे. बीड आणि परभणी असा दोन्ही कडचा चार्ज त्यांच्याकडे असताना त्यांची अक्षरशः तारेवरची कसरत होत असायची. पण अठरा-अठरा तास काम करून त्यांनी दोन्ही कडचा कार्यभार सांभाळला. त्यांनी बारा वर्ष नांदेड ते परभणी असे अपडाऊन केले. रोज सकाळी सहा वाजता ते घराच्या बाहेर पडायचे आणि रात्री बारा वाजता घरी येत. बाबा रात्री घरी आल्यानंतर आमच्या सगळ्यांशी गप्पा मारायचे. येताना आमच्यासाठी शेंगा, केळी, खरमुरे घेऊन यायचे . आई त्यांच्यासाठी रात्री बारा वाजता कुकर लावायची आणि गरमागरम तूप मेतकूट भात बाबाना खायला द्यायची. झोप आलेली असताना देखील आईने ते बारा वर्षे कधीही बाबांना रात्री थंड जेवण खायला दिले नाही . पुन्हा सकाळी पाच वाजता उठून बाबासाठी डबा करून बाबा सकाळी सहा वाजता घराच्या बाहेर पडायचे.

बाबांच्या सचोटीचा , प्रामाणिकपणाचा त्यांच्या डिपार्टमेंट मध्ये एक दबदबा निर्माण झाला होता. परभणीतील व्यापारी वर्ग देखील त्यांच्याशी अतिशय नम्रतेने वागायचे. कोणत्याही दुकानात गेलं तर तिथले व्यापारी उठून बाबा चे स्वागत करायचे आणि त्यांना स्वतःच्या खुर्चीवर बसवायचे. खरेदी झाली की बाबा लगेच खिशातून पैसे काढून दिले की व्यापारी म्हणायचे " राहू द्या साहेब काय गरज आहे?" बाबा म्हणायचे " नाही हो, पैसे तुम्हाला घ्यावेच लागतील."

बाबा नी  कधीही कुठल्याही व्यापाऱ्याकडून कोणतीही वस्तू तशीच आणली नाही. गंमत म्हणजे बाबाच्या नावाने त्यांच्या विभागातील काही लोकांनी परस्पर व्यापाऱ्यांकडून वस्तू घेऊन गेल्याचे किस्से आम्हाला नंतर कळत होते. बाबांच्या या कर्तुत्वाचा मला स्वतःला खूप फायदा झाला.  भारतीय बाल विद्या मंदिर या शाळेमध्ये मी दोन-तीन वर्ष विनावेतन काम केल्यानंतर ज्या वेळी पद भरण्याची वेळ आली त्यावेळी शाळेच्या व्यवस्थापन कमिटी कडून  अनेक नावे पुढे आली. बाबांचे व्यापारी मित्र सिंगवी साहेब हे आमच्या शाळेच्या प्रशासनावर होते. त्यांना माझे काम माहिती होते. मी बाबांना म्हणायची की तुम्ही माझ्यासाठी शब्द टाका.  बाबा म्हणायचे “अगं ताई तुझं काम चांगलं आहे तुझं सिलेक्शन नक्कीच होणार!” बाबांनी सिंगवी साहेबांना सांगितले “जर माझ्या मुलीचे काम चांगले असेल तरच तिचे सिलेक्शन करा अन्यथा नाही.” सिंगवी साहेबांनी माझे सिलेक्शन केले आणि माझी नोकरी सुरू झाली. आजच्या वशिल्या च्या आणि भ्रष्टाचाराच्या दुनियेत बाबा सारखी माणसं किती असतील कोणास ठाऊक ?

आमच्या बाबांची लहानपणीची गोष्ट हे आम्हाला आमच्या आत्याने सांगितले होते एका वर्षी राखी पौर्णिमेला बाबा चक्क चालत चालत  परभणीहून कौसडी ला आत्याच्या घरी गेले होते. भर पावसात चिखल तुडवत चार-पाच तास चालत बाबा बहिणीकडे गेले. बहीण-भावांचे हे निर्व्याज्य प्रेम शेवटपर्यंत कायम होते. आत्या घरी आल्या की आम्हाला खूप आनंद व्हायचा.  त्या सोजीचे पांढरे लाडू आणायच्या . ते आम्हाला खूप आवडायचे . बहिण भावंडांचा रात्र-रात्रभर गप्पा व्हायच्या. आमच्या आईने पण  आत्याचे खूप चांगले माहेरपण केले.  आईने आत्याला कधीही साडी घेतल्याशिवाय परत माहेरी पाठव परत पाठवले नाही. लेकीबाळी ला दिल्याने काही कमी पडत नसतं हि आमच्या आईची शिकवण! आत्याला पण आईचा स्वभाव खूप आवडायचा. दोघींचे  खूप छान जमायचे. “प्रेमल मला तुझ्या हाताची साबुदाण्याची खिचडी खूप आवडते “ असं म्हणायच्या. मग उपास नसला तरी आई आत्यासाठी भरपूर दाण्याचे कूट घालून

पोटभर साबुदाणा खिचडी खायला द्यायची.  "तुझे पदार्थ खूप चटक-मटक असतात आणि खूप छान लागतात" असं आत्या नेहमी म्हणायची.  आईच्या कुरडया पापड्या आणि अन्य तळलेल्या गोष्टी खूप आवडायच्या. आई त्यांच्यासाठी खास तळण करायची.

निवृत्ती नंतर  बाबांना मांडाखळी ला जायला खूप आवडायचे. जोपर्यंत नोकरी होती तोपर्यंत त्यांनी प्रामाणिकपणे नोकरी केले. धनु तर म्हणतो  त्यांनी २००% कामाचे आऊटपुट दिले त्यांच्याकडे पेंटिंग काम कधीच नसायचे. त्यामुळे त्यांचे वरिष्ठ देखील त्यांच्यावर खुश असायचे. 'कल करे सो आज कर आज करे सो अभी' हे आमच्या बाबांचे  आवडीचे वाक्य. रिटायरमेंट नंतर मात्र त्यांनी स्वतःला मांडाखळी च्या शेतीसाठी वाहून घेतले. रिटायर झाल्यानंतर त्यांनी पहिले काम केले ते म्हणजे मांडाखळी च्या शेतात विहीर करून घेतली. त्यावेळी धनु त्यांच्या सोबत असायचा. संपूर्ण विहीर बांधल्यानंतर जल पूजा देखील त्यांनी केली. शेतीत पाणी आल्यानंतर ऊस लावला. सतीश ला शेतीची खूप आवड. त्यामुळे बाबा सतीश ला कायम म्हणायचे "मेरा पैसा और तुम्हारा दिमाग!"

शेतीत त्यांना खूप नवे प्रयोग करायचे होते पण नंतर आईला आणि बाबांना दोघांनाही औरंगाबादला संजू कडे जावे लागले.  मग मांडाखळी च्या त्यांच्या चकरा  थोड्या कमी झाल्या. तरी बाबा महिन्यातून एक दोनदा परभणी ला येऊन मांडाखळी जात असत. त्यावेळी कायम मला फोन करून सांगायचे " ताई, आज संध्याकाळी हायकोर्ट ने मी येत आहे उद्या मांडाखळी ला जाईल" त्यांना मांडाखळी जाताना खूप आनंद व्हायचा. मी त्यांना डबा करून द्यायची. इथे आल्यानंतर ते नेहा सोबत कॅरम खेळत पत्ते खेळत!  तिकडे आदित्य सोबत देखील पत्ते खेळताना त्यांना खूप मजा यायची. ते या लहान मुलांसोबत खेळताना मुद्दाम स्वत: हरत. त्यांना विचारलं तर ते म्हणायचे " अगं खरी मजा मला हरण्यातच येते, जिंकल्यामुळे नेहा , आदित्य खुष किती खुश होतात

बघ!”  आजोबा आणि नातवाची खूप चांगली गट्टी जमायची. आई आणि बाबा यांनी सृष्टी आदित्य ला  लहानपणापासूनच खूप गोष्टी सांगितल्या. रामाच्या, कृष्णाच्या, शिवाजी महाराजांच्या. त्यामुळे दोघेही लहानपणापासूनच खूप ‘शार्प’ झाले. भक्ती ,नेहा ,कौस्तुभ यांनादेखील बाबांचा खूप लळा लागला. पूजा पुण्याला लांब असल्यामुळे फक्त महालक्ष्मी आणि उन्हाळ्यात तिची भेट व्हायची . तिच्या इंग्लिश पोयम ऐकून बाबा खूप खुश व्हायचे.  तिला बाबानी ‘बाबा ब्लॅक शीप हवे यू अनी वूल ही कविता त्यांनी शिकवली होती. महालक्ष्मीच्या वेळी  धनु मीना पुण्याहून यायचे रात्री किती उशीर झाला तरी बाबा उत्साहाने दार उघडायला पुढे असायचे. मग रात्री  दोन अडीच पर्यंत त्यांच्या गप्पा चालू असायच्या.  रात्री किती जरी उशिरा झोपलं तरी तरी सकाळी सहा वाजता उठून पुन्हा तयार!

आदित्य वरून त्याचे सर्व खेळणी खाली फेकून द्यायचा. पत्ते तर रोज टाकून द्यायचा. बाबा रोज त्याला नवीन पत्त्याचा डाव आणून द्यायचे. आई म्हणायचे “ अहो कशाला त्याला रोज नवे पत्ते आणून देता?  बाबा म्हणायचे  “ लेकरू खेळतय , खेळु दे त्याचे आई-बाबा दिवसभर बाहेर असतात!”  खूप जीव होता सर्व नातवंडा वर!  मांडाखळी च्या देवीला जाताना त्यांना खूप उत्साह असायचा. मांडाखळी ला त्यांच्या सोबत  कुणी येणार असेल त्यांना खूप आनंद व्हायचा . वयाच्या 76 व्या वर्षी त्यांनी नवरात्रामध्ये देवीच्या गडाला (वेढा )प्रदक्षिणा घातली. मांडाखळी च्या शेतीतून उत्पन्न काहीच मिळायचे नाही पण आम्ही म्हणायचो बाबांना त्यातून आनंद मिळतो हे महत्वाचे. त्या निमित्ताने शेती तीवून राहिली.

आम्ही सर्व भावंडानी बाबांची एकसष्टी पंच्याहत्तरी मोठ्या उत्साहात साजरी केली होती. पंच्याहत्तरी चा कार्यक्रम तर खूपच मोठा झाला होता. सर्वांचे भाषणे झाली होती. बाबानी देखील खूप चांगले भाषण केले होते. संजयरावांनी बाबांचे खूप छान रांगोळी चित्र काढले होते. बाबा आम्हाला कधीच आजारी पडले आहेत,

त्यांना त्रास होतो आहे, ते झोपून आहेत असं माहीतच नव्हतं. त्यांना विचारायचे "का हो काय बरं वाटत नाही का?" तर लगेच उठून उभा राहिला "कुठे काय मला काय झालं!" संजू आई बाबांना दिल्लीला विमानाने घेऊन गेला. आमच्या वहिनीचा भाऊ सतीश मामा शिगावकर तिथे त्यामुळे होता त्याच्याकडे राहून संपूर्ण दिल्ली दर्शन खूप छान झाले. २००१ साली आईची पुण्याला बायपास सर्जरी झाली. त्यावेळी बाबांनी आईची खूप सेवा केली. आईच्या गोळ्यांच्या वेळा कडे त्यांचे काटेकोरपणे लक्ष असायचे. त्या वेळेला बरोबर गोळ्या आणि पाण्याचा ग्लास घेऊन बाबा उभे असायचे. इतकी सेवा या काळात कुणीही करणार नाही . बाबा जर परभणीला असतील तर गोळ्यांच्या वेळेला आईला बरोबर फोन करून गोळ्यांच्या वेळेची आठवण करून द्यायचे. आज आमचे बाबा हवे होते. नात सून ,नात जावई, पतवंड पाहून त्यांना खूप आनंद झाला असता.पण केवळ आठ दिवस दवाखान्यात ऍडमिट राहिल्यानंतर 26 एप्रिल 1912 रोजी आमचे बाबा गेले!

पारखून घेतलं तर कोणीच आपलं नसत मात्र मन समजून घेतलं तर कोणीच परकं नसतं. आमच्या आई-बाबांनी सतत माणसं समजून घेतली. बाबा म्हणजे खांद्यावर बसवून स्वप्न दाखवणारे डोळे! बाबा म्हणजे अपार कष्ट करणारा शरीर ! बाबा म्हणजे स्वतःच्या इच्छा आकांक्षा बाजूला ठेवून मुलांसाठी झटणारे अंतकरण! वडिलांबद्दल काय लिहू आज जे काय आम्ही आहोत ते त्यांच्यामुळेच आहे आम्ही भावंड कायम त्यांच्या ऋणात राहू!



